रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक ३२३
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ११ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘रायगडमधील प्रलंबित रस्ते कामांना गती द्या’ / २
पंतप्रधानांच्या विक्रमी देशसेवा कार्याचा गौरव / ६
चिपळूणच्या तन्वी रेडीजने जिंकले जागतिक सुवर्ण / ८

### महाराष्ट्रात मान्सूनची आगेकूच; काही ठिकाणी हजेरी



**मुंबई :** महाराष्ट्रात मान्सूनने हजेरी लावली असून हळूहळू राज्यातील सर्व जिल्हे मान्सूनने व्यापले आहेत. पुढील तीन-चार दिवसांत नैऋत्य मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे दक्षिण कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व गुजरात प्रदेशात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. राज्यातील अनेक भागांत पावसाच्या हलक्या सरी कोसळत असून हवामानाबाबत विभागाने नवे अपडेट जारी केले. त्यात पुढील चार दिवसांत महाराष्ट्रात कमाल व किमान तापमानात विशेष बदल होण्याची शक्यता नसल्याचे म्हटले आहे, मात्र मुंबईत पुढील ४८ तासांत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पुढील ४८ तास ढगाळ वातावरण राहणार आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महाविक्रम!

# पनवेलमध्ये जल्लोषात स्वागत

### नेहरूंना मागे टाकत सलग सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात १० जून २०२६ हा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ लोकशाही पद्धतीने निवडून आलेले पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांनी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या तब्बल सहा दशकांहून अधिक काळ टिकून असलेल्या विक्रमाला मागे टाकले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळत अनेक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. मे २०१४ मध्ये पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा सत्तेवर आल्यापासून त्यांनी देशाच्या सर्वोच्च पदावर सलग ४,३९९ दिवसांचा टप्पा पूर्ण केला आहे, ज्यामुळे ते सलग सर्वाधिक काळ सेवा देणारे भारताचे पहिले लोकनियुक्त पंतप्रधान बनले आहेत. या गौरवपूर्ण आणि ऐतिहासिक कामगिरीबद्दल बुधवारी (दि. १०) पनवेलमधील विरूपाक्ष मंदिरात महाआरती करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्याची सामूहिक प्रार्थना करण्यात आली.




भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, नगरसेवक सुमित झुंझारराव, अजय बहिरा, नगरसेविका रुचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, सुहासिनी शिवणेकर, अमित ओझे, गुरुनाथ लोंढे, केदार भगत, रूपेश नागवेकर, उपेंद्र मराठे, विनायक मुंबईकर, अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

सलग सर्वाधिक काळ पदावर राहणाऱ्या निवडून आलेल्या पंतप्रधानांच्या बाबतीत त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकला आहे. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सलग विजय मिळवून त्यांनी सलग तीन वेळा पूर्ण कार्यकाळ पूर्ण करण्याच्या दिशेने आगेकूच केली आहे. गेल्या काही वर्षांत देशात अनेक पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती आणि कल्याणकारी योजनांचा विस्तार करण्यात आला आहे. गेल्या १२



वर्षांत भारताने परराष्ट्र धोरण आणि संरक्षण क्षेत्रात लक्षणीय झेप घेत जागतिक पटलावर आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. एकेकाळी आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये मर्यादित भूमिका बजावणारा भारत आज जागतिक निर्णयप्रक्रियेत प्रभावी आवाज म्हणून उदयास आला आहे. **(पान २ वर..)**

### विकास, विश्वास आणि जनसहभागाची तपपूर्ती -मुख्यमंत्री

**मुंबई :** महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी गर्जना आम्ही करतो तेव्हा त्यात आपण ठामपणे पाठीशी आहात, हा आत्मविश्वास मनात असतो. आपली साथ, आशीर्वाद असेच कायम आमच्या आणि महाराष्ट्र विकासाच्या पाठीशी राहोत, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली. पंतप्रधान म्हणून १२ वर्षांचा कार्यकाल पूर्ण केल्याबद्दल मोदींचे अभिनंदन करताना मुख्यमंत्र्यांनी जाहीर पत्राद्वारे मोदी यांच्या कार्याचा गौरव केला. विकास, विश्वास, जनसहभागाची १२ वर्षे पूर्ण झाली याचा अपार आनंद आज आमच्या मनात आहे, असे मुख्यमंत्र्यांनी पत्रात नमूद केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शनिवारी ‘रयत’तर्फे हृद्य सत्कार

### संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार गौरव

**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता सातारा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृद्य गौरव होणार आहे.

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी विधानसभा अध्यक्ष व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे असणार आहेत. त्याचप्रमाणे संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लिहिलेल्या ‘रामशेठ नाबाद ७५’ ग्रंथाचे प्रकाशन यावेळी खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे, तर संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या




जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या ‘अमृतपर्व’ स्मरणिकेचे प्रकाशनसुद्धा त्यांच्या हस्ते होईल. रयत शिक्षण संस्था व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचावे यासाठी ‘रयत’चे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात कर्मवीर अण्णांनी सुरू केलेला वसा पुढे नेण्याचे काम रयतसेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर अविरतपणे करीत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असतानाही त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जीवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले. ‘रयत’ला मातृसंस्था मानून तिच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजात आदर्श घालून दिला. सातारा येथे होणाऱ्या सत्कार सोहळ्यास संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शाखाप्रमुख सेवक उपस्थित राहणार आहेत. शिक्षणप्रेमींनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

## गोदावरी नदीत बोट उलटून महिलेचा मृत्यू

**बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पिंपरी येथे गोदावरी नदीपात्रात तब्बल ३० भाविकांना घेऊन जाणारी बोट उलटल्याची घटना बुधवारी (दि. १०) घडली. या भीषण अपघातात एका महिला भाविकाचा मृत्यू झाला असून, अन्य एक महिला गंभीर जखमी



झाली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरल्यामुळे नावेचा तोल गेला आणि हा अपघात घडला. दरम्यान, सदर अपघातात प्रमिला राठोड नावाच्या महिला भाविकाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर सिंधुबाई मावळ (रा. महागाव, जि. वाशीम) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### कागदी पासला रामराम; एसटीचा विद्यार्थी प्रवास होणार स्मार्ट

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांसाठी मोठा निर्णय घेतला. पारंपरिक कागदी बस पास बंद करण्यात आले असून सवलतीच्या प्रवासासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. लाखो विद्यार्थ्यांचा एसटी प्रवास आता डिजिटल होणार आहे. या निर्णयामुळे सवलतीच्या प्रवासात पारदर्शकता येणार आहे.

### पाक लष्कराचे हेलिकॉप्टर कोसळून १३ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानी लष्कराचे ‘एमआय-१७’ हेलिकॉप्टर कोसळून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत हेलिकॉप्टरमधील सर्व १३ जणांचा जागीच मृत्यू झाला. तांत्रिक बिघाडामुळे अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार हेलिकॉप्टर पाकव्याप्त काश्मीरमधील ‘नीलम व्हॅली’त अतिरेकी जवानांना घेऊन जात होते. मुझफ्फराबादजवळ उड्डाण घेतानाच हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला.

# जगबुडी नदीत बुडून तीन सख्ख्या भावंडांचा करुण अंत



**खेड : प्रतिनिधी**

खेड शहरालगतच्या जगबुडी नदीपात्रात बुधवारी (दि. १०) घडलेल्या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. मुंबईहून नातेवाइकांकडे सुट्टीसाठी आलेल्या तीन तरुण भावंडांचा नदीत बुडून मृत्यू झाला. एका क्षणात तिघांचे आयुष्य संपले आणि त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

आकाश रामा कांबळे (१७), नीलेश रामा कांबळे (११) आणि कैलास रामा कांबळे (१८) अशी मृत्युमुखी पडलेल्या तिघांची नावे आहेत. हे तिघे चेंबूर येथील मुकुंदनगर परिसरातील रहिवासी असून खेड शहरातील एकवीरानगर येथे राहणाऱ्या त्यांचे काका अनिल दगडू कांबळे आणि काकू पूजा कांबळे यांच्याकडे पाहुणे म्हणून आले होते. सुट्टीतील आनंदाचे काही दिवस नातेवाइकांसोबत घालवण्यासाठी आलेल्या या तिघांना मृत्यू इतक्या जवळ दबा धरून बसला आहे याची कल्पनाही नव्हती.

बुधवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास आकाश, नीलेश, कैलास आणि त्यांच्यासोबत असलेला गोपाल राय कांबळे हे महाड नाक्याजवळील जगबुडी नदीपात्रात पोहण्यासाठी गेले. सुरुवातीला सर्व काही सुरळीत सुरू होते. नदीकिनारी हशा, गप्पा आणि पोहण्याचा आनंद सुरू होता, मात्र नदीतील खोल पाण्याचा अंदाज न आल्याने काही वेळातच परिस्थिती भीषण बनली. दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास तिघांपैकी एक जण खोल पाण्यात बुडू लागला. आपल्या साथीदाराला मृत्यूच्या दाढेतून वाचवण्यासाठी उरलेले दोघेही त्याच्या मदतीला धावले, परंतु नियतीला काही वेगळेच मंजूर होते. एका जीवाला वाचवण्याच्या प्रयत्नात तिघेही तरुण खोल पाण्यात अडकले आणि काही क्षणांत जगबुडीच्या पाण्याने त्यांना कायमचे कवेत घेतले. त्यांचे काका अनिल कांबळे व मोठे बंधू यांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.

# नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीने पूर्ण करा -कृषिमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मे आणि जून महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारा आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करा. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन नुकसान भरपाईची प्रक्रिया गतीने पूर्ण करा, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंबंधात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीला पाणीपुरवठा मंत्री, जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, दुग्धव्यवसाय विकास व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल जावळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक विस्तार रफिक नाईकवडी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जिल्हाधिकारी जळगाव रोहन घुगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार, उपव्यवस्थापक अतुल ठनकर उपस्थित होते.

मे आणि जून महिन्यात राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये एकूण ८२ हजार तीन हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे, त्यापैकी १९ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण व पंचनाम्याची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. ७ जूनला झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्याचे अचूक मूल्यमापन करून भरपाईची प्रक्रिया गतीने राबवा, असेही भरणे यांनी सांगितले.

## गगनचुंबी इमारत, झोपडपट्टीसाठी आता स्वतंत्र रेडी रेकनर

**मुंबई : प्रतिनिधी**

एकाच परिसरात गगनचुंबी इमारत आणि झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी एकच दर न ठेवता आता वेगवेगळा रेडी रेकनर दर आकारला जाणार आहे. परिसरातील उपलब्ध सुविधांनुसार रेडी रेकनर दरांचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई शहरात ‘मायक्रो झोनिंग’साठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर या सर्वेक्षण संस्थेची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. १०) दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाच्या तपपूर्तीनिमित्त बावनकुळे यांनी हा निर्णय जाहीर केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेवरून राज्यात तीन टप्प्यांत मायक्रो झोनिंगसाठी सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री बावनकुळे यांनी २०२५च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेत मांडलेल्या ‘महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) शासकीय विधेयक क्र. ९’ च्या अनुषंगाने बुधवारी मंत्रालयात बैठक पार पडली.

## भावपूर्ण श्रद्धांजली

जगी ऐसा बाप व्हावा।
ज्याचा वंश मुक्तीस जावा॥



## स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

बुधवार दि. ०३/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी श्री माऊली चरणी विलीन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरंतर शांती लाभो हिच माऊली चरणी प्रार्थना!
तुका म्हणे पावठणी । करू स्वर्गाची निशाणी ।।

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| गुरूवार | ११/०६/२०२६ | श्री. नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ - कोपरा<br>गायिका - सौ. शिवमाला पाटील, पखवाज- निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ | दत्त प्रासादिक भजन मंडळ - आदई<br>बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शनिवार | १३/०६/२०२६ | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर<br>गुरूवर्य श्री.निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| रविवार | १४/०६/२०२६ | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे<br>संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर,<br>पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर | सायं. ७ ते ८.३० वा. |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन



सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुढे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



* किर्तनकार *
ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.

# विभागीय आयुक्तांनी पनवेल महानगरपालिका कामकाजाचा घेतला सविस्तर आढावा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या उपस्थितीत जनगणना, मतदार यांद्यांशी संबधित विशेष सखोल फेरतपासणी (SIR), घनकचरा व्यवस्थापन, बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन तसेच सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) या विषयांबाबत आढावा बैठक आज पनवेल महानगरपालिका मुख्यालयात घेण्यात आली.

पनवेल महानगरपालिका महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी विभागीय आयुक्त रूबल अग्रवाल यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध समस्यांविषयी चर्चा केली. महापौर तसेच पनवेल मनपा आयुक्त यांनी यावेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील पाणी समस्या आणि उपाययोजनांबाबत माहिती विभागीय आयुक्तांना दिली.

यावेळी घेण्यात आलेल्या बैठकीत मतदार यांद्यांशी संबधित विशेष सखोल फेरतपासणी (SIR) कामाचा आढावा घेऊन काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांविषयी चर्चा केली. SIR चे कामकाज वेगाने करणे आवश्यक असल्याचे सांगत याबाबत सूचना दिल्या. पनवेल महापालिकेच्या जनगणना विषयक कामकाजाची सध्यस्थिती जाणून घेत समाधान व्यक्त केले. जनगणना प्रक्रियेची तयारी, आवश्यक मनुष्यबळ, विविध विभागांमधील समन्वय तसेच जनगणना कामकाजाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीबाबत तसेच सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या कार्यक्षमतेविषयीही सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विभागीय आयुक्तांनी संबंधित विषयांबाबत आवश्यक सूचना देऊन समन्वय ठेवून कामे वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच जनगणना आणि स्वच्छता व्यवस्थापनाशी संबंधित कामांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीस कोकण विभागीय अतिरिक्त आयुक्त फारोग मुकादम, पनवेल मनपा अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, नगररचना सहाय्यक संचालक केशव शिंदे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त स्वरूप खारगे, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, तहसिलदार मिनल भामरे, सहायय्क आयुक्त सुबोध ठाणेकर, सहायय्क आयुक्त डॉ. रूपाली माने, सर्व चार्ज अधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले तसेच आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची भेट घेतली. सर्वांनी पटेल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेविका परेशा पटेल व अन्य.**




**पनवेल : ज्येष्ठ उद्योजक कान्हाशेठ ठाकूर (न्हावाखाडी) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निवासस्थानी सुरू असलेल्या भजन मंडळांच्या मालिकेत गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर यांनी भजन सेवा केली. यावेळी गायिका सुप्रिया घरत व सहकलाकार यांचा माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी सन्मान केला.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींना दीर्घायुष्य लाभावे म्हणून सुकापूर येथील विठ्ठल मंदिरात महाआरती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी दीर्घकाळ नेतृत्व करत विकासाची वाटचाल सुरू ठेवावी आणि त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे या सदिच्छेने भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळाच्या वतीने सुकापूर येथील विठ्ठल मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, महेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, दिवेश भगत, रवींद्र केणी, हनुमान खुटले, पांडुरंग केणी, शशिकांत पाटील, चांगदेव ठाकूर, आत्माराम पाटील, परशुराम पाटील, संजय पाटील, चंद्रकांत केणी, वसंत म्हसकर, उदय म्हसकर, प्रशांत गांगुर्डे, प्रितेश मोरे, राहुल पोपटा, प्रशांत म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, जनार्दन पाटील, बाळकृष्ण पाटील, पुष्पा म्हसकर, प्रमिला पाटील, जयश्री पाटील, विनायक शेळके,वसंजय म्हात्रे, बाबुराव पोपटा, सचिन खरात, गुरुनाथ पोपटा, रुपेश पाटील, प्रमोद पोपेटा, नेताजी पाटील, संदीप पाटील, आदित्य केणी, योगेश लाला, ओमकार पेवेकर, अलोक निर्मल आदी उपस्थित होते.

# धोदाणीश्वर मंदिरामध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने आरतीचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




लोकशाही मार्गाने सलग सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवण्याचा मान मिळवतभारताच्या इतिहा४सात नवा सुवर्णकाळ रचणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याउत्तम आरोग्यासाठी पनवेल तालुक्यातील धोदाणी येथील धोदाणीश्वरमंदीरामध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने आरतीचे आयोजन करण्यात आलेहोते.

या महाआरतीच्या माध्यमातून मोदीजींना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांचेभविष्य उज्ज्वल राहो, अशी प्रार्थना सर्व उपस्थितांनी देवाचरणी केली.

यावेळी मालडुंगे ग्रामपंचयतीचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपणाचं जनार्दन निरगुडा,शकेंद्र प्रमुख विकास घरत, विष्णू पारधी, अर्जुन कांबडी, दामोदर चौधरी,जयश्री चौधरी, लहू चौधरी, कान्हा मेंगाळ, भिडू चौधरी, बामी चौधरी, हाशी चौधरी,बामी चौधरी, यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेकडून पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खासगी केंद्रांना नोंदणीचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० अंतर्गत ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी केंद्रांनी शासनाच्या नियमानुसार नोंदणी करणे आवश्यक असल्याचे आवाहन प्राथमिक शिक्षण संचालनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे, या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने देखील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा व शिक्षण केंद्रांनी आपल्या संस्थेची नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार ५+३+३+४ या शैक्षणिक आकृतीबंधातील पहिल्या पाच वर्षांच्या टप्प्याला 'पायाभूत स्तर' म्हणून संबोधण्यात आले आहे.

यामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्षे (वयोगट ३ ते ६ वर्षे) तसेच इयत्ता पहिली व दुसरीचा समावेश आहे. या अनुषंगाने राज्यातील प्री स्कूल ,नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनीअर केजी( Pre School, Nursery, Jr. KG व Sr. KG) या पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची अधिकृत नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने Pre School Registration Portal (ECCE) उपलब्ध करून दिले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांची सर्वसाधारण माहिती, व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती तसेच संबंधित कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या निर्देशानूसार पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाच्या डिजीटलायजेशनसाठी सातत्यने प्रयत्न करत आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा व शिक्षण केंद्रांनी आपल्या संस्थेची नोंदणी www.education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील Pre School Registration Portal (ECCE) या टॅबवर जाऊन आवश्यक माहिती भरून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# उरणकरांवर पाणीकपातीचे संकट

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



मान्सूनचा पाऊस यंदा लांबण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे उरणकरांच्या चिंतेत वाढ होऊ लागली आहे. दरम्यान रानसई धरणाने मृत साठ्याची पातळी गाठली असून, पुढील काळात या साठ्यातून पाणीपुरवठा केला जाणार असल्याची माहिती एमआयडीसीने दिली आहे. त्यामुळे उरण शहरात सुरू असलेल्या पाणी कपातीत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मे महिन्यातील वाढत्या तापमानामुळे येथील रानसई धरणातील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे त्यामुळे धरणातील हे पाणी जून अखेरपर्यंत पुरविण्याचा प्रयत्न एमआयडीसी करत आहे.

मात्र यासाठी नागरिकांनाही या काळात पाण्याचा जपून वापर करावा असे आवाहन करण्यात येत आहे. गेली अनेक वर्ष रानसई धरणातील पाणी साठवणूक क्षमता वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे.दरम्यान रानसई धरणातील पाणीसाठा ८४ फुटांवर आला आहे. ही पातळी मृत पाणी साठ्याची आहे. मान्सून लांबला तरी उरणकरांना नियमित पाणीपुरवठा होणार आहे. त्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. मात्र या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करून पाणी जपून वापरावे असे आवाहन उरणच्या एमआयडीसीचे उपअभियंता ज्ञानदेव सोनवणे यांनी केले आहे.

# अपघातात अडीच वर्षीय मुलीचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्कुटीला पाठीमागून कंटेनरने दिलेल्या धडकेत अडीच वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी कंटेनरच्या चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रितवी तेजस पाटील (राहणार अंधेरी) असे मृत मुलीचे नाव आहे.

ती आई–वडीलासह बुधवार ( दि. ९ जून ) रोजी रायगड जिल्ह्यातील आपल्या गावाहुन येत असताना फाल्कन कंपनी गेट, गव्हाण फाटा जवळ त्यांच्या स्कुटी क्र. एम एच ०२ जीएफ ५९५४ ला पाठीमागून आलेला कंटेनर क्रमांक एम एच ४३ सीके ७०५७ धडक दिली.

या अपघातात सर्वजण खाली पडले पत्नी आणि मुलगी गंभीर जखमी झाली. पोलिसांनी त्यांना स्थानिक नागरिकांच्या मदतीने रुग्णालयात दाखल केले असता अडीच वर्षीय मुलीला डॉक्टरांनी मृत घोषित केले.त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली .

पनवेल पोलिसांनी कंटेनर आणि कंटेनर चालकाला ताब्यात घेतला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे करत आहेत.

# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



पोलीस उप आयुक्त, (वाहतूक) नवी मुंबई, डॉ. राहुल खाडे यांनी पनवेल शहर येथे भेट देऊन पनवेल शहर वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत असलेल्या उत्कृष्ट कामकाजाची तसेच वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या वाहतूक उपाययोजनांची दखल घेऊन समाधान व्यक्त केले.

पनवेल शहर वाहतूक शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी रस्ते अपघाताच्या ठिकाणी तात्काळ मदत करून जखमींना रुग्णालयात दाखल करून त्यांचे प्राण वाचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले. तसेच मोटरसायकल ट्रॅपच्या माध्यमातून वाहनचोरीचा प्रयत्न उधळून लावत आरोपीस ताब्यात घेण्यात आले. याशिवाय शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिसरात वाहनाद्वारे बाईकवरून हायड्रो गांजाची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन संबंधित अधिकारी व अंमलदारांना बक्षीस मंजूर करण्यात आले. तसेच त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

या कामगिरीमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील, पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस हवालदार अमीर मुलाणी, केशव निकम, सतीश वाघमारे, महेंद्र राजपूत, सागर यादव, राकेश घाडगे, तसेच पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ, सचिन शिंदे, यांचा समावेश असून त्यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यात आला.यावेळी पोलीस उप आयुक्त (वाहतूक) डॉ. राहुल खाडे यांनी रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रभावी वाहतूक नियमन व कठोर अंमलबजावणी करून 'झिरो अपघाती मृत्यू' हे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच वाहतूक पोलीस हे तेथील पोलीस प्रशासनाचा चेहरा असून त्यांनी नागरिकांशी नेहमी सौजन्यपूर्ण, शिस्तबद्ध व जबाबदारीने वर्तन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. याकार्यक्रमास पनवेल शहर वाहतूक शाखेचे तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## संपादकीय

# ट्रम्प यांना मोठा धक्का

अमेरिकन नागरिकांच्या नोकऱ्यांचे रक्षण करण्याच्या नावाखाली राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या सप्टेंबरमध्ये जारी केलेली एच–१बी व्हिसासाठीची अफाट शुल्कवाढ अमेरिकेतील फेडरल कोर्टाने आता रद्द केली आहे. ट्रम्प यांच्या तेव्हाच्या आदेशानुसार ठराविक नवीन एच–१बी व्हिसा मिळवण्यासाठी कंपन्यांना १ लाख डॉलर मोजावे लागणार होते. या निर्णयामुळे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात व विशेषतः भारतात मोठी खळबळ उडाली होती. कारण अमेरिका दरवर्षी जितके एच–१बी व्हिसा जारी करते त्यातील तब्बल ७० टक्के लाभार्थी हे भारतीय आयटी क्षेत्रातील असतात.

**गेल्या सप्टेंबर महिन्यात एच–१बी व्हिसासाठी जाचक शुल्कवाढ करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेथील संसदेची अर्थात काँग्रेसची मंजुरी घेतली नव्हती. त्यामुळे ट्रम्प यांनी एका आदेशान्वये एच–१बी व्हिसासाठी प्रस्तावित केलेली तब्बल १ लाख डॉलरची शुल्कवाढ मॅसॅच्युसेट्स फेडरल न्यायालयाने आता बेकायदा ठरवत रद्द केली आहे. अमेरिकेत नोकरी करण्याचे स्वप्न पाहणारे हजारो भारतीय आयटी व्यावसायिक तसेच त्या क्षेत्रातील अमेरिकी कंपन्यांनाही या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. अर्थात ट्रम्प यांच्या प्रशासनाने न्यायालयाच्या या निकालाविरोधात अपील करण्याचे ठरवले असून स्वतः ट्रम्प यांनी तर हा निकाल अमेरिकेच्या हितसंबंधांचे नुकसान करणारा असल्याची टीका केली आहे. हे न्यायाधीश आपल्याला फार त्रास देतात असा कांगावाही ट्रम्प यांनी केला आहे. प्रत्यक्षात अमेरिकेतील न्यूयॉर्कसह २० राज्यांनी ट्रम्प यांच्या जाचक व्हिसा शुल्कवाढीला न्यायालयात आव्हान दिले होते. ही व्हिसा शुल्कवाढ करताना ट्रम्प प्रशासनाने आपल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केल्याचा दावा या २० राज्यांच्या गटाने केला होता. अमेरिकेत आयटी, शिक्षण आणि आरोग्य सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये लाखो परदेशी कुशल कर्मचारी काम करतात. या क्षेत्रातील भरती आवश्यक त्या प्रमाणात करणे आधीच अवघड झालेले असताना ट्रम्प यांनी केलेल्या भरमसाठ शुल्कवाढीमुळे त्यात भीषण अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळेच मॅसॅच्युसेट्स फेडरल न्यायालयाच्या निकालाचे अमेरिकेतील अनेक राज्यांनी स्वागतच केले आहे. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या काही काँग्रेस सदस्यांसह इतर अनेक लोकप्रतिनिधी, अमेरिकेतील भारतीय तसेच अन्य काही गटांकडूनही या निकालाचे स्वागत केले गेले आहे. हे केवळ व्हिसा शुल्क नसून हा एक प्रकारचा करच आहे. एच–१बी व्हिसा अर्जदारांवर कर आकारण्याचा अध्यक्षांना कोणताही अधिकार नाही असे मॅसॅच्युसेट्समधील बोस्टन फेडरल न्यायालयाच्या न्यायाधीशांनी म्हटले आहे. या प्रकारचा कोणताही कर आकारताना काँग्रेसची म्हणजेच तेथील संसदेची पूर्वसंमती आवश्यक आहे असे फेडरल न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे. ट्रम्प यांनी सप्टेंबरमध्ये शुल्कवाढीच्या आदेशावर स्वाक्षरी करण्यापूर्वी कर्मचारी संख्या व अन्य घटकांनुसार दोन हजार ते पाच हजार डॉलर इतके एच–१बी व्हिसा शुल्क आकारले जात असे. या शुल्कात अफाट वाढ केल्यामुळे परदेशी कुशल कर्मचाऱ्यांची गरज असणाऱ्या कंपन्यांचे धाबे दणाणले होते. हे शुल्क साधारणपणे नियुक्ती करणाऱ्या कंपन्याच भरत असतात. त्या सर्वांनाच न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. दरवर्षी एच–१बी अंतर्गत सुमारे ६५ हजार व्हिसा दिले जातात. त्याशिवाय उच्चपदवी असलेल्या २० हजार कर्मचाऱ्यांना तीन ते सहा वर्षांसाठी व्हिसा दिला जातो. या दोन्ही प्रकारांमध्ये भारतीयांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कायदेशीर स्थलांतर रोखण्याच्या ट्रम्प यांच्या प्रयत्नांना अमेरिकेच्या न्यायव्यवस्थेने मोठा धक्का दिला आहे.**

# ‘अमृत मानस मित्र’चे मोफत प्रशिक्षण

आजच्या वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक ताणतणाव, भावनिक समस्या, वर्तनात्मक अडचणी, सोशल मीडिया व डिजिटल व्यसन, करिअरविषयक संभ्रम, तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आणि त्यामुळे अनेक गंभीर घटना आणि समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही गरज आणि समस्या लक्षात घेऊन अमृत या संस्थेने ही सामाजिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.




महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (AMRUT) मार्फत "अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक भागीदार (Technical Partner) म्हणून कार्यरत राहणार आहे.

MIMH ही मानसिक आरोग्य क्षेत्रातील शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि क्षमता विकासासाठी कार्यरत असलेली महाराष्ट्र शासनाची प्रमुख संस्था असून मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या प्रशिक्षणामध्ये संस्थेचा दीर्घ अनुभव आहे. या अनुभवाच्या आधारे प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, प्रशिक्षण पद्धती, पर्यवेक्षण (Supervision) आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी MIMH मार्फत पार पाडण्यात येणार आहे. अमृत संस्थेमार्फत " समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्यात येत असून मानसशास्त्र, समुपदेशन आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील युवक–युवतींसाठी स्वयंरोजगार, व्यावसायिक विकास आणि समाजोपयोगी कार्याची रोजगार आणि स्वयंरोजगार यासाठी मोठी संधी उपलब्ध होत आहे.

अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमात काय आहेः–अमृत मानसमित्र कार्यक्रमांतर्गत शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, भावनिक स्वास्थ्य आणि जीवनकौशल्य विकासासाठी प्रशिक्षित समुपदेशक तयार करण्यात येणार आहेत.

प्रशिक्षणामध्ये खालील बाबींचा समावेश असेलः विद्यार्थी समुपदेशनाची मूलतत्त्वे, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये व सक्रिय श्रवण, तणाव व्यवस्थापन व भावनिक स्वास्थ्य, जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध आणि संकट व्यवस्थापन, सायबर सुरक्षा व डिजिटल आरोग्य, पालक व शिक्षकांसोबत समन्वय, मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन, शाळा आधारित समुपदेशन व रेफरल प्रणाली.

प्रशिक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या संधीः प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना खालील क्षेत्रांमध्ये कार्य करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते : शाळा व महाविद्यालयीन समुपदेशक, मानसमित्र समुपदेशक, जीवनकौशल्य प्रशिक्षक,मानसिक आरोग्य जनजागृती प्रशिक्षक, पालक व शिक्षक कार्यशाळा समन्वयक, विद्यार्थी कल्याण अधिकारी, स्वयंरोजगाराच्या माध्यमातून समुपदेशन सेवा.

कौशल्य विकास प्रशिक्षण : अमृत मानसमित्र अंतर्गत विद्यार्थी समुपदेशकांसाठी विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष समुपदेशन कौशल्ये, केस स्टडी, रोल प्ले, सुपरव्हिजन, मार्गदर्शन आणि क्षेत्रीय अनुभव यांचा समावेश असेल.

प्रशिक्षणाचे स्वरूप :– प्रशिक्षणाचे स्वरूप हायब्रीड (ऑफलाइन + ऑनलाइन) असेल. १५ दिवसांचे प्रत्यक्ष वर्ग प्रशिक्षण, एक महिन्याची निरीक्षणाधारित क्षेत्रीय नियुक्ती, ऑनलाइन तज्ज्ञ सत्रे व केस चर्चा, सहा महिन्यांचे मार्गदर्शन व सुपरव्हिजन यामुळे कार्यरत व्यावसायिक, विद्यार्थी आणि इतर इच्छुकांना प्रशिक्षणात सहभागी होणे सुलभ होईल.

किती जणांना संधी आणि निवड प्रक्रिया कशीः– प्रत्येक जिल्ह्यातील गरज, विद्यार्थी संख्या आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाईल. सर्वसाधारणपणे प्रत्येक बॅचमध्ये किमान २० ते कमाल ३० उमेदवारांना प्रवेश दिला जाईल.

पात्रता निकष : एम.ए./एम. एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम. एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र, मास्टर ऑफ सोशल वर्क (MSW), अमृतच्या लक्षित गटातील उमेदवार असल्याचे पुरावे (डोमेसाईल, उत्पन्नाचा दाखला, जातीचा पुरावा) या शैक्षणिक पात्रता असलेले अमृत च्या लक्षित गटातील उमेदवार अर्ज करू शकतात.

प्रशिक्षण स्थळ आणि निवासी व्यवस्था– सहा महिन्याच्या एकूण प्रशिक्षण कार्यक्रमापैकी पंधरा दिवस ऑफलाइन प्रशिक्षण हे महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथे होणार आहे. या १५ दिवसांसाठी निवास आणि भोजनाची व्यवस्था विद्यार्थ्यांनी स्वतः करायची आहे.

मोफत प्रशिक्षण – अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांचा या सहा महिन्याच्या प्रशिक्षणाचा शैक्षणिक खर्च अमृत या संस्थेमार्फत केल्या जाणार आहेत. म्हणजेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना मोफत प्रशिक्षण आहे.

प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि त्याचे फायदे –




प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना "अमृत मानसमित्र समुपदेशक" हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. या प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवारांना : शाळा व महाविद्यालयांमध्ये समुपदेशक म्हणून संधी, अमृत मानसमित्र उपक्रमाशी संलग्न होण्याची संधी, मानसिक आरोग्य व जीवनकौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी, स्वयंरोजगार व व्यावसायिक प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

अमृत संस्थेच्या वेबसाईटवर (https://mahaamrut.org.in/) अमृत मानस मित्र या योजनेंतर्गत इच्छुकांना अर्ज करता येईल. यासाठी आवश्यक असलेले कागदपत्राचे पुरावे अपलोड करावे लागतील. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांना ‘प्रथम येईल त्याच प्राधान्य’ या तत्त्वावर या प्रशिक्षणासाठी प्रवेश दिल्या जाईल.

अमृत मानस मित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पहिल्या बॅचसाठी ऑनलाईन अर्ज १५ ते २२ जून या कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येईल. छाननीअंती पात्र उमेदवारांना ईमेल/मेसेजद्वारे कळविण्यात येईल.

इतर तपशिलासाठी अमृत या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेच्या जिल्हा व्यवस्थापक, अमृत रायगड जिल्हा कार्यालय, कलेक्टर ऑफिस परिसर उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला अलिबाग, रायगड कार्यालयाला भेट देऊन अमृत जिल्हा व्यवस्थापक यांच्याशी संपर्क (९११२२२८७५९) साधावा.

(साभार : रायगड जिल्हा माहिती कार्यालय)

## बदलते तंत्रज्ञान

### जेमिनीच्या मदतीने ‘सिरी’ बनणार सुपरफास्ट; iOS २७ लाँच

टेक जगतातील सर्वात मोठी आणि बहुप्रतीक्षित परिषद असलेल्या ॲपल वर्ल्डवाईड डेव्हलपर्स कॉन्फरन्स २०२६ची दणक्यात सुरुवात झाली आहे. ॲपलचे मुख्य कार्यकारी अधिकारी टिम कुक यांच्या कीनोट भाषणाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळच्या परिषदेत ॲपलने संपूर्ण लक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ‘ॲपल इंटेलिजन्स’वर केंद्रित केले आहे. या इव्हेंटमधील सर्वात मोठा धमाका म्हणजे ॲपलने आपला व्हॉईस असिस्टंट ‘सिरी’ अधिक प्रगत करण्यासाठी थेट प्रतिस्पर्धी कंपनी गुगलच्या ‘जेमिनी’ सोबत हातमिळवणी केली आहे. याशिवाय, ॲपलने नवीन ऑपरेटिंग सिस्टीम iOS २७देखील लाँच केली आहे.





ॲपलने सिरीला पूर्णपणे रिडिझाईन करून ‘Siri AI’ म्हणून सादर केले आहे. आता गुगल जेमिनी मॉडेल्सच्या मदतीने सिरी युजर्सचे संभाषण आणि व्हिज्युअल इंटेलिजन्स अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल. सिरीच्या आवाजाचा वेग आणि बोलण्याचा टोन युजर्सना आता कस्टमाईझ करता येणार आहे. मॅकओएस मध्ये सिरीसाठी ‘डायनॅमिक आयलंड’सारखा इंटरफेस देण्यात आला आहे.

ॲपलने iOS २७, watchOS २७ आणि iPadOS २७वरून पडदा उचलला आहे. कंपनीचा दावा आहे की, हा ॲपलचा आतापर्यंतचा सर्वात मोठा आयओएस रिलीज आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आयफोन ११ आणि त्यानंतरच्या सर्व मॉडेल्सना नवीन iOS २७चे अपडेट मिळणार आहे. आयफोन ११पर्यंत सपोर्ट करण्यासाठी कंपनीने ‘CPU Scheduler’देखील ऑप्टिमाइझ केला आहे.

ॲपलचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट क्रेग फेडेरिगी यांनी स्पष्ट केले की, एआय फीचर्स वापरताना युजर्सच्या प्रायव्हसीशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. युजर्सचा डेटा फक्त त्यांची विनंती पूर्ण करण्यासाठीच वापरला जाईल. पारदर्शकता वाढवण्यासाठी ॲपल पहिल्यांदाच बाह्य ऑडिट करणार आहे. तसेच मुलांच्या सुरक्षेसाठी एक खास ‘चाइल्ड सेफ्टी मोड’ जाहीर करण्यात आला आहे. गेल्या वर्षी लाँच झालेल्या ‘लिक्विड ग्लास’ इंटरफेसमध्ये आयकॉन्सच्या ट्रान्सपरन्सीमुळे (पारदर्शकता) युजर्सना त्रास होत होता. या परिषदेत ॲपलने हा इंटरफेस अधिक चांगला आणि कस्टमाईझ करण्यायोग्य करून सादर केला आहे, ज्यामुळे स्क्रीन रिस्पॉन्स आणि लूक अधिक प्रीमियम झाला आहे.

# उद्योजक घनश्यामदास बिर्ला

## निमित्त



आपल्या देशामध्ये अनेक असे उद्योजक होऊन गेले, ज्यांनी देशाचं भविष्य घडवण्यासाठी कठोर मेहनत घेतली. घनश्यामदास बिर्ला हे त्यांच्यापैकीच एक नाव. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म १० एप्रिल १८९४ रोजी राजस्थानच्या पिलानी गावात एका मारवाडी कुटुंबात झाला. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये हे नाव प्रामुख्याने घेतले जावे अशा पद्धतीचे त्यांचे कार्य होते. त्यांनी भारतामध्ये अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था तसेच धार्मिक संस्थांची स्थापना करून भारताला प्रगतीकडे वाटचाल

करण्यासाठी मदत केली. ज्याने एकेकाळी गरिबीचे चटके सहन केलेले आहेत, ज्याला गरिबी काय असते याची पूर्णपणे जाणीव होती, पण यामुळे त्यांनी परिस्थितीला कधीच दोष दिला नाही. त्यांनी त्यांचा संघर्ष नेहमीच चालू ठेवला. त्यांना स्वतःवर विश्वास होता. त्यांना माहिती होते की आपण आयुष्यामध्ये काहीतरी मोठे नक्कीच करून दाखवू शकतो.

जेव्हा त्यांचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांच्या बिर्ला ग्रुपच्या मालकीच्या दोनशे कंपन्या अस्तित्वात होत्या आणि या संपूर्ण कंपन्यांची एकूण संपत्ती दोन हजार कोटीच्या आसपास होती, पण हे सत्य खूप कमी जणांना माहिती असेल की घनश्यामदास बिर्ला त्यांच्या बंधूसोबत एका लहानशा खोलीमध्ये राहत असत. त्याच खोलीमध्ये स्वयंपाक करत असत आणि स्नानही त्याच खोलीमध्ये करत असत.


घनश्यामदास बिर्ला यांच्याबद्दल अजून एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, त्यांचे शिक्षण पाचवी पर्यंतच झालेले होते. ज्यावेळी त्यांचे मोठे बंधू त्यांना असे सांगत की आपलं नशीब आपल्या सोबत नाही, त्यावेळी घनश्यामजी त्यांच्या मोठ्या बंधूंना समजावून सांगत की नशीब आपल्या हातामध्ये असते आणि आपल्या कष्टाने आणि कर्मानेच आपण एक दिवस या जगाला काहीतरी नेत्रदीपक करून दाखवू.

या सर्व प्रवासात त्यांचा स्वतःवरील विश्वास हीच त्यांची सर्वांत मोठी ताकद होती. त्यांनी काही दिवसांनी त्यांच्याकडील काही पैशांची जमवाजमव करून स्वतःचा सुती व्यवसाय सुरू केला.

ज्यावेळी त्यांनी हा व्यवसाय चालू केला, त्यावेळी या पूर्ण व्यवसायावर फक्त इंग्रजांचा एकाधिकार होता, त्यामुळे इंग्रजांनी त्यांना या व्यवसायामध्ये अनेक अडचणी उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. या परिस्थितीतही घनश्यामजी खचले नाहीत, त्यांना आशा होती की याही परिस्थितीतून ते मार्गक्रमण करतील आणि इतिहास साक्षी आहे, की त्यांनी या सर्व संकटांवर मात करत एक विशाल कार्य भारताच्या प्रगतीसाठी करून दाखविले. त्यांनी अशा परिस्थितीतही त्यांचा व्यवसाय यशस्वीरीत्या केला. त्यांनी एक नव्हे तर दोनशे कंपन्यांची स्थापना केली. त्यांची प्रगती इंग्रज थांबवू शकले नाहीत. बिर्ला यांनी अनेक मंदिरांची स्थापना केली, अनेक ट्रस्ट स्थापन केले, जे लोकांना गरजेच्या वेळी मदत करतात.

घनश्यामजींनी स्थापन केलेली पिलानी येथील बिट्स संस्था आज भारतातील अग्रगण्य अभियांत्रिकी संस्थांपैकी एक मानली जाते. त्यांनी समाजाचे देणे म्हणून मुंबईमध्ये एक विशालकाय इस्पितळ बनवून घेतले. त्यांनी देशभरामध्ये अनेक ठिकाणी शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. अशा या महान उद्योजकाचे ११ जून १९८३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### कॅन्सरचा धोका वाढवणाऱ्या किचनमधील ‘या’ वस्तू

आपलं ‘स्वयंपाकघर’ हे घरातील असं ठिकाण असतं, जिथून संपूर्ण कुटुंबाचं आरोग्य सांभाळलं जातं, पण ज्या स्वयंपाकघराला आपण आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे मानतो, तिथेच कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजाराचे शत्रू लपून बसले आहेत. आपण नकळतपणे रोज अशा काही वस्तू वापरत असतो, ज्या आपल्या शरीरात हळूहळू विष कालवण्याचं काम करत आहेत. याचा अर्थ या वस्तूंमुळे थेट कॅन्सर होतो असे नाही, परंतु त्यांचा अयोग्य वापर किंवा खराब झालेल्या वस्तूंचा सतत संपर्क आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे.



किचन स्पंज :– भांडी घासण्यासाठी आणि साफसफाईसाठी उपयोगात येणारे किचन स्पंज आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. डॉक्टरांच्या मते, अशा प्लास्टिक स्क्रबर, स्पंजचा वापर करणं लगेच सोडून दिले पाहिजे. यामध्ये असलेले मायक्रोप्लास्टिक जेवणात जाऊ शकते. याऐवजी तुम्ही एखाद्या सुती (कॉटनच्या) कपड्याचा वापर करू शकता. वापरल्यानंतर हा कपडा कडक उन्हात सुकवावा.

प्लास्टिक स्पॅटुला :– किचनमध्ये ठेवलेले वेगवेगळ्या रंगाचे स्पॅटुला दिसायला खूप छान वाटतात. बहुतांश लोक अन्नपदार्थ वाढण्यासाठी यांचा वापर करतात, परंतु या चमच्यांच्या समोरील काळ्या रंगाच्या कोटिंगमध्ये कॅन्सर निर्माण करणारे केमिकल्स असतात. यांचा वापर केल्याने हे केमिकल्स जेवणामध्ये मिक्स होतात आणि कॅन्सरसारखा आजार होण्याचा धोका वाढतो.

प्लास्टिक कटिंग बोर्ड :– रिपोर्ट्सनुसार प्लास्टिक बोर्डवर चाकू फिरवल्याने दररोज बोर्डमधून लाखो मायक्रोप्लास्टिक्स तुटून वेगळे होतात, जे भाजीसोबत आपल्या पोटात जाऊ शकतात. यापेक्षा उत्तम हे आहे की तुम्ही स्टीलच्या कटिंग बोर्डचा वापर करावा.

कुकरचे रबरी गॅस्केट :– कुकरमध्ये प्रेशर (वाफ) तयार करण्यासाठी रबरी गॅस्केट आवश्यक असते. अति उष्णता आणि दाब निर्माण झाल्यामुळे हे रबर वितळून जेवणात मिसळू शकते.

प्लास्टिकच्या बाटल्या :– प्लास्टिकच्या बाटलीचा वारंवार वापर केल्याने समस्या वाढू शकतात. या बाटल्या केवळ एकदाच वापरण्यासाठी (सिंगल युज) बनवलेल्या असतात. वारंवार वापर केल्यामुळे त्यांच्या आत बारीक तडे पडतात, ज्यामध्ये हानिकारक बॅक्टेरिया आणि बुरशी जमा होते. यामुळे कॅन्सरव्यतिरिक्त इतरही अनेक आजार होऊ शकतात.

# नेरळ पोलिसांची कामगिरी; ४८ तासांत दोन गुन्हे उघड

**नेरळ : प्रतिनिधी**

कुरंग आदिवासी वाडीत १० वर्षीय हेमंत रामदास सराई याच्या अंगात शिकारीच्या बंदुकीतील छरे घुसून तो गंभीर जखमी झाल्याच्या धक्कादायक घटनेचा नेरळ पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत उलगडा केला आहे. नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी स्वतः तपासाची सूत्रे हाती घेत दोन दिवस परिसरात तळ ठोकून आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. घटना घडल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घराच्या मागील बाजूस



खेळत असलेल्या हेमंतच्या अंगात चार ठिकाणी शिकारीचे छरे घुसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत होता.

या गंभीर घटनेचा छडा लावण्यासाठी राहुल वरोटे यांनी पोलिस पथकासह जंगल परिसर, आदिवासी वाड्या आणि संशयितांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी मुलाच्या जखमी प्रकरणात जांभूळवाडी येथील २७ वर्षीय चंद्रकांत केवारी, हर्याचीवाडी येथील २५ वर्षीय कृष्णा पादिर आणि २६ वर्षीय मधुकर सराई या तिघांना ताब्यात घेतले. आरोपींकडून शिकारीसाठी वापरण्यात येणाऱ्या दोन ठासणीच्या बंदुका जप्त करण्यात आल्या आहेत.विशेष म्हणजे, हेमंत सराई प्रकरणाचा तपास सुरू असतानाच पोलिसांनी स्वतंत्र कारवाई करत जांभूळवाडी खिंडीत राहणाऱ्या प्रशांत पारधी याला विनापरवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी ताब्यात घेतले. त्याच्याकडून शिकारीची बंदूक, छरे, शिसे तसेच गंधक पावडर जप्त करण्यात आली. त्यामुळे हेमंत प्रकरणात तिघे आणि अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी एक अशा एकूण चार जणांना ताब्यात घेण्यात आले असून नेरळ पोलिसांनी एकाच वेळी दोन महत्त्वाच्या कारवाया यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

या तपास मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक सुशील काजरोळकर, एस. एस. शेंबडे, आर. एन. वसावे, पोलीस हवालदार राजाराम पिंगळे, महेश खंडागळे, सचिन वाघमारे, निलेश कोंडार, राजाभाऊ केकान, आशू बेंद्रे, विनोद वागणेकर आणि कुशल काळोखे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तपास पथकाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच अल्पावधीत गुन्ह्याचा उलगडा होऊ शकला.मुलाला जखमी करणाऱ्या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेणे आणि त्याचवेळी बेकायदेशीर शस्त्रसाठ्यावर स्वतंत्र कारवाई करणे, ही नेरळ पोलिसांची दुहेरी कामगिरी ठरली आहे. राहुल वरोटे यांच्या नेतृत्वाखालील या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर शिकारी करणाऱ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली असून ग्रामस्थांकडून पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## दांडफाटा येथे मोटारसायकल अपघातात चालक गंभीर जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील दांडफाटा एसटी स्टँड जवळ मोटारसायकल मार्गावरच ठेवलेल्या पाइपला धडकली. या अपघातात चालक गंभीर जखमीं झाल्याने जखमीला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले. रस्त्याच्या बाजूला पाईप ठेवल्याने या ठिकाणी महिनाभरात ३ अपघात घडले असुन ४ जण जायबंदी झाले आहेत. जखमीचे नाव रामदास जगताप



असल्याची माहिती देण्यात आली आहे. हे पाइप महाराष्ट्र जलप्राधिकरणचे असल्याने याबाबत सदर पाईपमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी पाइप मार्गापासून दुर करण्याची मागणी केली जात आहे.

## शंकरा आय हॉस्पिटल आणि विजय चॅरिटेबलतर्फे मोफत नेत्र शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि.१० जून २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ३० रुग्णांची तपासणी करून १४ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४८ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत ४०२४ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे.दक्षिण रायगडातील माणगाव,महाड,म्हसळा,श्रीवर्धन,तळा,पोलादपूर,रोहा आदी तालुक्यांतील गेल्या तीन वर्षात ४०२४ हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया या शिबिरात यशस्वीपणे करण्यात आले असून गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना सांगितले. सदर शिबीर आयोजित करण्यासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा,मनीष मेथा, विधिता मेथा यांनी विशेष आभार व्यक्त केले.



# ‘पक्ष संघटना वाढीसाठी आपण लवचिक राहणे आवश्यक’




**कर्जत : प्रतिनिधी**

' कर्जत मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एक नंबरला आहे. तो अधिक बळकट करण्याचा प्रयत्न आपण सारे करीत आहोत. आपण पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांनी लवचिक राहिल्यास संघटना मजबूत होण्यासाठी बळ मिळेल. प्रत्येकाने आप आपल्या भागात आपला पक्ष पुढे राहण्यासाठी प्रयत्न करावा. प्रत्येक गावात पक्षाचा बूथ लेव्हल प्रतिनिधी नियुक्त करून मतदार याद्यांच्या सक्षमीकरणाच्या कामावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. नाहीतर मतदार संख्या कमी झाल्यास आपल्यासाठी ती धोक्याची घंटा असेल. आगामी काळात कार्यकर्त्यांसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करून पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाईल. आपण महा युतीत असलो तरी येथे आपल्या दोन पक्षांची परिवर्तन विकास आघाडी अबाधित राहील.' असे महत्वपूर्ण प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी केले.

कर्जत मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्क कार्यालयात पक्षाच्या 'निष्ठा, क्रांती आणि जनसेवेची २७ वर्षे' या संकल्पनेवर आधारित झालेल्या२७ व्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते सकाळी दहा वाजून दहा मिनिटांनी पक्षाचा ध्वज फडकवण्यात आला. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, सुनील पाटील, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, कर्जत तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, नगरसेवक महेंद्र चंदन, नेहा शिंदे, ॲड. राजेंद्र निगुडकर, महिला विधानसभा संघटक ॲड. पूजा सुर्वे, महिला तालुकाध्यक्ष रंजना धुळे, महिला शहर अध्यक्ष मधुरा चंदन, माजी नगरसेविका सुवर्णा निलधे, पंकज पाटील, शेखर जांभळे, कुमार दिसले, युवक अध्यक्ष ॲड. स्वप्निल पालकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. पूजा सुर्वे यांनी, 'राजकारणात महिलांची भूमिका महत्वाची आहे. घरात देखील कर्ता पुरुष मोठे निर्णय घेताना आई, बहीण किंवा पत्नीशी चर्चा करतात. महिला एखाद्या घरात चुली पर्यंत जाऊन चर्चा करू शकतात. पक्ष संघटनेत त्यांना पुढे केले पाहिजे.' असे स्पष्ट केले. अशोक भोपतराव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापने पासूनचा पक्षाच्या कार्याचा आढावा सादर केला. ॲड. रंजना धुळे, ॲड. राजेंद्र निगुडकर, संतोष बैलमारे, ॲड. योगेश देशमुख यांनीही आपले विचार मांडले.

यावेळी कर्जत कुशिवली ठाकूरवाडी तसेच खोपोली परिसरातील साईबाबानगर, शिळफाटा येथील आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. घारे यांच्या हस्ते प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.

## माणुसकीचा स्पर्श; संभाजी ब्रिगेडचा स्वराज्य वृद्धाश्रमात हृदयस्पर्शी उपक्रम

**माणगाव : बातमीदार**

समाजातील ज्येष्ठ नागरिकांविषयी कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकी जपत संभाजी ब्रिगेड रायगड जिल्ह्याच्या वतीने स्वराज्य वृद्धाश्रमात अन्नदान व स्नेहसंवाद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आदरणीय प्रवीणदादा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या उपक्रमाने वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या जीवनात आनंदाचे आणि भावनिक क्षण निर्माण केले.



संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला आघाडीच्या सदस्यांनी आश्रमातील ज्येष्ठ महिला आणि पुरुष आश्रितांशी आत्मीयतेने संवाद साधला. त्यांच्या समस्या, भावना आणि जीवनप्रवास जाणून घेत त्यांना मानसिक आधार देण्यात आला. केवळ अन्नदान न करता त्यांच्यासोबत बसून भोजन करण्याचा निर्णय घेतल्याने ज्येष्ठांच्या मनातील एकटेपणाची भावना मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे दिसून आले.

कार्यक्रमादरम्यान आश्रितांनी विविध गीते सादर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. "इतनी शक्ति हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना" आणि "रघुपति राघव राजाराम" या गीतांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. अनेक ज्येष्ठांच्या डोळ्यांत अश्रू होते, मात्र ते दुःखाचे नव्हते; तर त्यांना मिळालेल्या प्रेम, सन्मान आणि सहवासाचे होते.

विशेष बाब म्हणजे, कुटुंब आणि समाजाकडून उपेक्षित झाल्यानंतरही या ज्येष्ठांच्या मनात कोणतीही तक्रार किंवा राग नव्हता. उलट ज्यांनी त्यांना दूर केले, त्यांनाच सद्बुद्धी लाभावी अशी प्रार्थना ते परमेश्वराकडे करत असल्याचे पाहून उपस्थित सर्वजण भावूक झाले.

शिवश्री सुर्वे यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीने आर्थिक मदतीसोबतच आपला वेळ अशा ज्येष्ठ, निराधार व उपेक्षित बांधवांसाठी द्यावा, असे आवाहन केले. "जीवनात कमावलेली संपत्ती एक दिवस मागे राहते, मात्र माणुसकीने दिलेला वेळ आणि प्रेम कायम स्मरणात राहते," असे त्यांनी सांगितले.

## अन्न व औषध प्रशासनाने केली कर्जतमधील हॉटेलवर कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या विभागाचा कारभार स्वीकारल्यानंतर राज्यभर अन्न सुरक्षा नियमांची कठोर कारवाई सुरु झाली. या कारवाईचा एक भाग म्हणून चौक – कर्जत रस्त्यावरील प्रसिद्ध असलेल्या ठाकरे हॉटेल आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र व कागदपत्रांची पूर्तता नसल्याने बंद करण्यात आले. मंगळवारी ही कारवाई करण्यात आली.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ आणि संबंधित नियमांनुसार प्रत्येक अन्न व्यवसायिकाकडे वैध नोंदणी किंवा परवाना, स्वच्छतेचे नियम व आवश्यक कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन होत आहे की नाही? याची तपासणी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. या कारवाई दरम्यान, कर्जत शहरातील आमराई भागात असलेल्या कृष्णा स्वीट मार्ट ला पथकाने भेट देऊन खाद्य पदार्थाचे नमुने तपासणीसाठी घेतले. संबंधित कागदपत्रांचीदेखील छननी करण्यात आली असून प्रयोग शाळेच्या अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

कर्जतमध्ये गुटखा विक्री विरोधातही कारवाई सुरु असून काही प्रमाणात साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत तीन जणांवर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली आहे. या कारवाई मुळे हॉटेल व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. कर्जत परिसरात पथक सातत्याने तपासणी करीत आहे. ठाकरे हॉटेलकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने सदर कारवाई करण्यात आली आहे.

## रघुनाथ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त लोकार्पण सोहळा व सामाजिक उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बोर्ले गाव येथे विविध विकास कामांचा भूमीपूजन व उद्घाटन समारंभ बुधवार, दिनांक १० जून २०२६ रोजी दुपारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा सोहळा शिवसेना पक्षाचे पनवेल तालुका प्रमुख रघुनाथशेठ मंगल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या विकास कामांचे उद्घाटन आणि भूमीपूजन खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचे चिरंजीव पिंपरी चिंचवडचे नगरसेवक विश्वजीत बारणे तसेच नगरसेवक निलेश बारणे यांच्या शुभहस्ते पार पडले.



या सोहळ्यादरम्यान बोर्ले गावातील नागरिकांच्या सुविधेसाठी मंजूर झालेल्या महत्त्वाच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये मौजे बोर्ले गाव येथील नूतन आरसीसी स्मशानभूमीचे उद्घाटन करण्यात आले, ज्यासाठी खासदार निधीतून १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. यासाठी मंत्री भरत गोगावले यांच्यातर्फे जिल्हा नियोजन निधीतून पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्मशानभूमी परिसरामध्ये नागरिकांच्या सुविधेसाठी नवीन निवारा शेड बांधण्याच्या कामाचेही भूमीपूजन करण्यात आले असून, या कामासाठी खासदार निधीतून १० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यानंतर रघुनाथ पाटील यांच्या निवासस्थानाजवळील सभामंडपात शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संच ,वह्या वाटप करण्यात आले तर महिलांना छत्र्यांचे वाटप केले.

रघुनाथ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित या लोकार्पण सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यामध्ये पिंपरी चिंचवडचे नगरसेवक विश्वजीत बारणे तसेच नगरसेवक निलेश बारणे, सरपंच आश्वीनी शिसवे,रामदास शेवाळे, विनोद साबळे, परेश पाटील, संतोष म्हात्रे, एसपी ग्रुपचे (SP Group) सागर भाई तवले, नंदू पाटील, तुकाराम गायकवाड, बाळकृष्ण पाटील, माऊली घोगरे आणि वैजयंती ठाकूर या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून विकासकामांचा गौरव केला व रघुनाथ पाटील यांना वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक (कब्जेदार) **१. श्रीमती. शांताबाई रामकृष्ण ठाकूर मयत वारस सौ. देवता दत्तात्रेय म्हात्रे, २. श्री. गौतम रामकृष्ण ठाकूर, ३. श्री. राकेश भरत ठाकूर** यांच्याकडून खरेदी घेणेचे निश्चित झाले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे. कान्होबा, ता. पेण, जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर. चौ. मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ७६ | ० | ०-१५-२०<br>पो.ख. ०-००-५०<br>**एकूण ०-१५-७०** | २.१२ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दाण, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदील, ट्रस्ट, वारस या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहित रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही तर सदर मिळकत हि निर्वेध बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे सर्व लोकांस कळावे.

**सही/-**
**ॲड. योगेश एम तुपविहीरे**
पत्ता- ऑफिस नं ०१, प्लॉट नं. ३८०, उलवे,
नवी मुंबई- ४१०२०६. मो. नं - ९६५३१६७८१९


# उन्हाळी सुट्ट्यांच्या सांगतेला रायगड जिल्हा बहरला

**पाली : प्रतिनिधी**

जैवविविधतेने नटलेले विलोभनीय निसर्ग सौंदर्य, विस्तीर्ण समुद्रकिनारा, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांमुळे उन्हाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्याकडे वळतात. सध्या उन्हाळी सुट्ट्या संपत आल्याने जिल्ह्यातील पर्यटन स्थळे पर्यटकांनी गजबजली आहेत. उन्हाळी पर्यटनाचा हा अखेरचा टप्पा असून, अवघ्या ३ ते ४ दिवसांत पर्यटक परतीच्या प्रवासाला लागतील.

सध्या पुणे, मुंबईसह राज्यभरातून आलेल्या पर्यटकांमुळे हॉटेल व्यावसायिक, खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार आणि राईड्सवाले यांची चांदी झाली आहे. जिल्ह्यातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान, रायगड किल्ला तसेच अष्टविनायकांपैकी महडचा वरदविनायक व पालीचा बल्लाळेश्वर येथे पर्यटक व भाविकांची रीघ लागली आहे. अलिबाग येथील कुलाबा किल्ला आणि दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे देवदर्शन व समुद्रकिनाऱ्याचा सुरेख संगम पर्यटकांना आकर्षित करत आहे. अलिबागचे नागाव, वरसोली, मुरुडचे काशिद आणि श्रीवर्धनचे दिवेआगर समुद्रकिनारे हाऊसफुल्ल झाले असून, तिथे घोडागाडी, एटीव्ही राईड्स व उंट सफारीचा आनंद घेतला जात आहे.

तसेच, शहरातील लोकांना ग्रामीण भागातील रिसॉर्ट्स, फार्महाऊस व ॲग्रो टुरिझमचे मोठे आकर्षण आहे. शुद्ध हवा, चुलीवरचे जेवण आणि मोबाईल नेटवर्कपासून दूर राहून पर्यटक रिफ्रेश होत आहेत. स्विमिंग पूल, टेंट आणि ट्रेकिंगला बच्चेकंपनी व कुटुंबांची मोठी पसंती मिळत आहे.

आता सुट्ट्यांचा हंगाम सरताना पर्यटकांची गर्दी वाढली आहे. समुद्रकिनारे फुल्ल असून अनेकांनी बुकिंग केले आहे. असे दिवेआगर येथील व्यावसायिक सिद्धेश कोसबे यांनी सांगितले. उन्हाळी सुट्ट्या संपण्यापूर्वी कुटुंब आणि मित्रांसह कोकण पाहण्यासाठी आलो. दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन व अष्टविनायक क्षेत्राला भेट दिली, असे पर्यटक अनंत पाटील यांनी सांगितले.




### मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

पत्ता : भुखंड क्र.१, सेक्टर २२, फेज २, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१० २०८
नोंदणी क्रमांक: एन. बी. ओ. एम./सिडको/एच एस जी / (टी.सी)/१०४५३/ए. आर/सन २०२५-२०२६
Email: marwachssector२२@gmail.com

**निविदा सूचना**

मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या, साठी खालील नमूद आवश्यक सेवा सुविधांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | निविदा तपशील | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| निविदा १ | १२ सुरक्षा रक्षक आणि २ पर्यवेक्षक अधिकारी, १२ तासाचे २ शिफ्ट | १४ जून २०२६ पर्यंत | सोसायटी कार्यालय मारवा, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. भूखंड क्र.१, सेक्टर-२२, फेज २, तलोजा, ता. पनवेल, नवी मुंबई. |
| निविदा २ | इलेक्ट्रिशियन २ | | |
| निविदा ३ | प्लंबर १ | | |
| निविदा ४ | २९ लिफ्ट साठी एम. एम. सी. | | |
| निविदा ५ | हाऊस कीपिंग एजन्सि | | |
| निविदा ६ | फायर अमसी | | |
| निविदा ७ | लेखा परीक्षक (Auditor) | | |

**जा.क्र. १४२/मारवा सह. गृह.सं. मर्या./ २०२६-२०२७**
**दिनांक : ०७/०६/२०२६**

**सही/-**
**श्री. कुलदीप श्रीरंग पवार**
**अध्यक्ष**
**मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**

# पंतप्रधान मोदी यांच्या विक्रमी देशसेवा कार्यकाळाचा गौरव!

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते महाआरतीचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळत सर्वात प्रदीर्घ काळ पंतप्रधान म्हणून देशसेवा करण्याचा एक नवा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधत, नवी मुंबईतील बोनकोडे येथील प्रसिद्ध श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत बोनकोडे येथील श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात विशेष महाआरती आणि पूजा–अर्चना करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या नेतृत्वाखाली भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ अधिक समृद्ध व्हावा, यासाठी या वेळी साकडे घालण्यात आले. तसेच देशाची अखंडता आणि प्रगतीची घोडदौड अशीच अविरत सुरू राहावी, यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी विठ्ठल–रुक्मिणीच्या चरणी प्रार्थना केली.

हा सोहळा अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. याप्रसंगी नवी मुंबई महापालिकेचे सभागृह नेते सागर नाईक, नगरसेविका वैष्णवी नाईक , नगरसेविका अदिती नाईक , नगरसेविका ॲड भारती पाटील , नगरसेविका ॲड सायली शिंदे , नगरसेविका मीनाक्षी पाटील , नगरसेवक मुनावर पटेल , नगरसेवक संदीप म्हात्रे ,नगरसवेक रविकांत पाटील , नगरसेवक रॉबिन मढवी , माजी नगरसेवक नगरसवेक लीलाधर नाईक , भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून या महाआरतीमध्ये सहभाग घेतला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऐतिहासिक देशसेवा कार्यकाळाचा गौरव केला.



## आ. मंदा म्हात्रे यांच्या हस्ते आई गोवर्धनी माता मंदिरात महापूजा व महाआरती



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सलग १२ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने आमदार मंदा म्हात्रे यांच्या शुभहस्ते बेलापूर येथील आई. गोवर्धनी माता मंदिरात महापूजा व महाआरती करण्यात आली. यावेळी भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, नगरसेवक दीपक पवार, नगरसेविका शिल्पा कांबळी, भाजपा नेते निलेश म्हात्रे, उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश अनिल कौशिक, ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड यांच्यासह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यानसमवेत "संघटनात्मक बैठक" देखील संपन्न झाली.

यावेळी देशाच्या सर्वांगीण विकास तसेच राष्ट्राच्या समृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२वर्षांत भारताने पायाभूत सुविधा, अर्थव्यवस्था, सामाजिक कल्याण, परराष्ट्र धोरण आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधल्याचे मत आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे भारताने जागतिक स्तरावर नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास" या मंत्राच्या माध्यमातून देश विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचला असून विकसित भारताच्या संकल्पनेला अधिक बळ मिळाले आहे.महापूजा व महाआरती नंतर उपस्थितांनी भारताच्या प्रगतीसाठी, जनकल्याणासाठी आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली.

यावेळी बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, प्रभाकर कांबळे, ज्योती पाटील, मालती सोनी, सुमा रणजीत, देवयानी मुकादम, शीतल जगदाळे, मनीष बिजलानी, प्रवीण भगत, निनाद होनराव, कल्पेश कुंभार, रामकृष्ण अय्यर, प्रवीण चिकणे, अशोक चटर्जी, दामोदर पिल्ले, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाशीगाव येथे उपमहापौरांनी केली शिवमंदिरात महाआरती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान कार्यकिर्दीस १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल बुधवारी वाशीगावात भारतीय जनता पक्षाच्या वतीने उपमहापौर दशरथ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. प्रेमनाथ पाटील चौकातील श्री वासुदेवेश्वर शिवमंदिरात कार्यकर्त्यांसह महाआरती आयोजित करण्यात आली होती.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आदेशित केल्यानुसार वनमंत्री गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे नगरसेवक निशांत भगत यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेविका फशीबाई भगत, संदीप भगत यांच्यासह प्रभागातील नागरिक, ग्रामस्थ व व्यापारी प्रतिनिधी उपस्थित होते.

देशासेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात करून पंतप्रधान म्हणून सलग ४३९९ दिवस पंतप्रधान म्हणून सेवा देणाऱ्या नरेंद्र मोदी यांना उत्तम दीर्घायुष्य, आरोग्य व त्यांचे उज्ज्वल नेतृत्व अधिक लाभावे अशी प्रार्थना महाआरतीने ईश्वराकडे करण्यात आल्याचे उपमहापौर दशरथ भगत यांनी म्हटले आहे.

भारत देशाच्या शेजारील अनेक देशांत व आखाती राष्ट्रामध्ये परिस्थिती गंभीर असताना, १२ वर्षांपासून आपल्या देशात जनतेला स्थिर जीवनमान देण्यात मोदींचे नेतृत्व सक्षम ठरले आहे, हि भूषणवह बाब आहे असा देखील भगत यांनी उल्लेख यानिमित्ताने केला.



## नवी मुंबईत अतिरिक्त निवासी युनिट्सना दंडात्मक शुल्क आकारून नियमित करणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील बंगले आणि रो–हाउस भूखंडांवर मंजूर आराखड्यापेक्षा अधिक निवासी युनिट्स उभारलेल्या मालमत्ताधारकांसाठी सिडकोने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अशा अतिरिक्त निवासी युनिट्सना दंडात्मक शुल्क आकारून नियमित करण्यास मंजुरी देण्यात आली असून, त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मालमत्ता व्यवहारांना आणि पुनर्विकास प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये स्वतंत्र बंगले आणि रो–हाउसचे विभाजन करून त्यामध्ये अतिरिक्त निवासी युनिट्स तयार करण्यात आल्याची अनेक प्रकरणे आहेत. या बांधकामांपैकी अनेकांना नियोजन प्राधिकरणाची आवश्यक मंजुरी नसल्याने संबंधित मालकांना विविध प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत होता. मालकी हस्तांतरण, वारस नोंदणी, गहाण परवानगी, पुनर्विकास मंजुरी यांसारख्या प्रक्रियांमध्ये या मालमत्तांना अडथळे निर्माण होत होते.

सिडको संचालक मंडळाने मंजूर केलेल्या नव्या धोरणानुसार अशा अतिरिक्त निवासी युनिट्सना आर्थिक दंड आकारून वैधता दिली जाणार आहे. निवासी वापरासाठी तयार करण्यात आलेल्या अतिरिक्त युनिट्सच्या बाबतीत भूखंडाच्या राखीव किमतीच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. तर निवासी भूखंडाचा व्यावसायिक वापर करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये अधिक दंडात्मक आकारणीची तरतूद करण्यात आली आहे.

**प्रलंबित मालमत्ता व्यवहारांना चालना**

नियमितीकरणानंतर संबंधित मालमत्तांना विविध इस्टेट सेवांचा लाभ घेणे शक्य होणार आहे. हस्तांतरण परवानगी, गहाण व्यवहारांसाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र, वारस हक्क नोंदणी यांसारख्या सेवा मिळविण्यात येणाऱ्या अडचणी दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे दीर्घकाळ अडकून पडलेले अनेक मालमत्ता व्यवहार मार्गी लागण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, ज्या मालमत्ताधारकांनी नियमांनुसार सर्व परवानग्या घेतल्या आहेत आणि कोणतेही नियमभंग केलेले नाहीत, त्यांच्याकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. त्यामुळे नियमांचे पालन करणाऱ्या मालकांवर आर्थिक बोजा पडणार नसल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. नियमितीकरणानंतर अशा मालमत्तांच्या पुनर्विकासालाही विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीनुसार मंजुरी मिळू शकणार असल्याने जुन्या वसाहतींमधील पुनर्विकासाच्या प्रस्तावांना चालना मिळण्याची शक्यता आहे.

**वाशीतील शेकडो कुटुंबांना दिलासा**

या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम वाशीतील सेक्टर १२ आणि २८ परिसरात जाणवण्याची शक्यता आहे. या भागांमध्ये अतिरिक्त निवासी युनिट्स असलेल्या अनेक मालमत्ता असून त्यांचे नियमितीकरण हा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न होता. त्यामुळे या परिसरातील शेकडो कुटुंबांना दिलासा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना नवी मुंबई भाजपचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक शशिकांत राऊत यांनी हा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे सांगितले. वाशी मधील अनेक कुटुंबांना या निर्णयाचा थेट लाभ होणार असून, पुनर्विकासाच्या प्रक्रियेलाही गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले. या प्रश्नासाठी स्थानिक नागरिक आणि प्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचे सांगीतले.

## मत्स्यबंदीच्या काळात प्रवासी बोटींची वाहतूक सुरूच

**नवी मुंबई : बातमीदार**



राज्यातील सागरी मत्स्यसंपत्तीचे संवर्धन, तसेच मासळीच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दरवर्षीप्रमाणे यंदाही १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांवर बंदी लागू केली आहे. या आदेशाचे पालन करत नवी मुंबई परिसरातील कोळी बांधवांनी आपल्या मासेमारी नौका समुद्रकिनारी नांगरून ठेवल्या आहेत. मात्र, दुसरीकडे बेलापूर परिसरात खासगी प्रवासी बोटींची वाहतूक नियमितपणे सुरू असल्याचे चित्र दिसत असून, यामुळे स्थानिक मच्छीमारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक कोळी बांधवांचे म्हणणे आहे की, शासनाच्या आदेशानुसार त्यांनी दोन महिन्यांसाठी आपला पारंपरिक व्यवसाय थांबवला आहे. यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होत असतानाही ते सागरी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी नियमांचे पालन करत आहेत. मात्र, त्याच समुद्री क्षेत्रात खासगी प्रवासी बोटी विनाअडथळा सुरू असल्याने नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

यावेळी कोळी बांधव आणि मच्छीमार संघटनांच्या मते, जर सागरी परिसंस्थेच्या संरक्षणासाठी बंदी आवश्यक असेल, तर संबंधित क्षेत्रातील सर्व प्रकारच्या समुद्री वाहतुकीवर समान निकष लागू होणे गरजेचे आहे. अन्यथा, केवळ मच्छीमारांवर निर्बंध लादून इतरांना मोकळीक देणे ही दुहेरी भूमिका असल्याची भावना निर्माण होत आहे. तसेच या खासगी प्रवासी बोटींच्या हालचालींकडे सागरी सुरक्षा पोलीस आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही केला जात आहे.

दरम्यान, संबंधित यंत्रणांनी या प्रवासी बोटींच्या परवानग्या, सुरक्षाविषयक नियम व कार्यपद्धतीबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी.

## नवी मुंबईत ३० जून रोजी पहिल्या 'डाक अदालती'चे आयोजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

टपाल सेवांशी संबंधित नागरिकांच्या तक्रारींचे आणि विविध समस्यांचे वेळेत निवारण करण्यासाठी भारतीय टपाल विभागाच्या नवी मुंबई विभागाद्वारे आगामी ३० जून २०२६ रोजी पहिल्या 'डाक अदालती'चे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ टपाल अधीक्षक श्री. बी. व्ही. एन. सुरेश यांच्या मार्गदर्शनाखाली ही अदालत पार पडणार असल्याची माहिती नवी मंडळ टपाल विभागाचे वरिष्ठ अधिक्षक यांनी दिली आहे.

भारतीय डाक
डाक सेवा-जन सेवा
India Post
Dak Sewa-Jan Sewa

या डाक अदालतीमध्ये प्रामुख्याने नवी मुंबई विभागांतर्गत येणाऱ्या टपाल सेवांशी संबंधित अशाच तक्रारींची दखल घेतली जाईल, ज्या मूळ तक्रार दाखल केल्यापासून ६ आठवड्यांच्या कालावधीत सोडवल्या गेलेल्या नाहीत. यामध्ये विनानोंदणीकृत व नोंदणीकृत पत्रे, स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, टपाल बचत बँक आणि मनी ऑर्डरचे पैसे न मिळणे यांसारख्या विविध सेवांबाबतच्या प्रलंबित तक्रारी व गाऱ्हाणी स्वीकारली जातील आणि त्यांच्यावर प्रत्यक्ष सुनावणी घेऊन तात्काळ निवारण केले जाईल. ही डाक अदालत मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वरिष्ठ टपाल अधीक्षक, नवी मुंबई विभाग, वाशी मुख्य डाकघर (MDG) इमारत, तळमजला, हिंदुराव पाटील मार्ग, सेक्टर १६ए, प्लॉट नं. १८, एमटीएनएल (MTNL) कार्यालयासमोर, वाशी, नवी मुंबई – ४००७०३ या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

डाक अदालतीमध्ये आपली तक्रार सादर करताना नागरिकांनी आपल्या अर्जात मूळ तक्रार दाखल केलेली तारीख, तक्रारदाराचे नाव आणि ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार आधी पाठवली होती त्यांचे पदनाम यांसह आवश्यक तो संपूर्ण तपशील देणे बंधनकारक आहे. इच्छुक ग्राहकांनी आणि नागरिकांनी आपल्या तक्रारींचे अर्ज दोन प्रतींमध्ये (In Duplicate) वरिष्ठ टपाल अधीक्षक, नवी मुंबई विभाग, वाशी – ४००७०३ यांच्या पत्त्यावर दिनांक १५ जून २०२६ किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवायचे आहेत. या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन नवी मुंबई परिसरातील टपाल ग्राहकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निवारण करून घ्यावे, असे आवाहन नवी मुंबई मंडळ वाशी टपाल विभागाच्या वरिष्ठ टपाल अधीक्षकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## १४ जून रोजी पनवेलमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणातील तंत्रज्ञान समाकलन राष्ट्रीय परिषद

**नवी पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवी पनवेल येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या वतीने आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा यांच्या शिक्षण संकायाच्या संयुक्त विद्यमाने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : उच्च शिक्षणातील तंत्रज्ञान समाकलनातील आव्हाने आणि संधी" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १४ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उच्च शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल शिक्षण, ऑनलाइन अध्यापन, नवतंत्रज्ञानाचा समावेश आणि त्यासंबंधित आव्हाने व संधी यांवर या परिषदेमध्ये सखोल विचारमंथन करण्यात येणार आहे.

या परिषदेस महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा यांच्या कुलगुरू मा. प्रा. कुमुद शर्मा यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष मा. श्री. धनराज डी. विसपुते आणि सचिव मा. सौ. संगीता डी. विसपुते यांच्या प्रेरणेतून या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेच्या उद्घाटन सत्रात मा. प्रा. कुमुद शर्मा, कुलगुरू, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा या उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख व्याख्यान प्रा. गोपाल कृष्ण ठाकूर, अधिष्ठाता, शिक्षण संकाय, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा यांचे होणार आहे. परिषदेतील तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. जी. श्रीनिवास, प्रादेशिक संचालक, इग्नू प्रादेशिक केंद्र, पणजी (गोवा) हे "NEP २०२०: Use and Integration of Technology" या विषयावर, डॉ. सी. ए. चक्रदेव, प्राचार्य, चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर हे "Integration of Artificial Intelligence in Higher Education" या विषयावर, तर डॉ. महेश कोलतमे, सहयोगी प्राध्यापक, पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, मुंबई हे "Emerging Disruptive Technologies in Education" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. समारोप सत्रामध्ये प्रा. सुनीता मागरे, प्राध्यापक, शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. या राष्ट्रीय परिषदेस देशभरातील शिक्षक, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ७५ संशोधन निबंध प्राप्त झाले आहेत. या संशोधन निबंधांचे ISSN युक्त परिषद कार्यवृत्त (Conference Proceedings Volume) प्रकाशित करण्यात येणार असून ते शिक्षण क्षेत्रातील संशोधकांसाठी महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरणार आहे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सीमा एन. कांबळे, प्राचार्या, श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवी पनवेल यांच्या नेतृत्वाखाली आयोजन समिती कार्यरत असून डॉ. हेमचंद्र ससाणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे.

# पालीतील प्रलंबित प्रश्न भाजपच सोडवणार; भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई यांचा दावा

**पाली : प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेत विराजमान असल्याने पाली-सुधागडसह रायगड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली असून, पालीतील जनतेला भेडसावणारे मूलभूत व प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन भाजप रायगडचे ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ देसाई यांनी केले. आगामी पाली नगरपंचायत निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा सत्ता स्थापन करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पालीतील पत्रकार परिषदेत प्रकाशभाऊ देसाई यांनी विविध प्रश्नांवर भाजपची भुमिका स्पष्ट केली.



पाली येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना देसाई म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला आहे. भाजपा रायगड जिल्हाध्यक्ष, माजी खासदार धैर्यशील पाटील यांच्या कुशल व सक्षम नेतृत्वात पक्षाला उभारी मिळत आहे. पालीतील शुद्ध पाणीपुरवठा योजना, बायपास रस्ता, ग्रामीण रुग्णालय आणि बसस्थानक यांसारखे महत्त्वाचे प्रश्न भाजपच्या माध्यमातूनच मार्गी लागतील. या प्रश्नांसंदर्भात नुकतीच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेण्यात आली असून सर्व विषयांवर सकारात्मक चर्चा झाली आहे . त्यामुळे पालीतील विकासकामांना लवकरच गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देसाई पुढे म्हणाले की देशभरात भारतीय जनता पक्षाची यशस्वी वाटचाल सुरू असून पश्चिम बंगालसह विविध राज्यांमध्ये पक्षाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश मिळवत जिल्हा परिषदेवर अध्यक्षपद मिळविले आहे. तसेच सुधागड तालुक्यात सभापती व उपसभापती पदांवर घटक पक्षांना सोबत घेत सत्ता स्थापनेत जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मत भाजप नेते देसाई यांनी व्यक्त केले.

जनतेने दाखविलेला विश्वास आणि मिळालेले यश कायम राखण्यासाठी पक्षाकडून धोरणात्मक पावले उचलली जात असून कार्यकर्ते एकसंघपणे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी नगरपंचायत निवडणुका जिंकण्यासाठी भाजप सज्ज असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पाली शहरातील शुद्ध पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी भाजपकडून सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे देसाई यांनी सांगितले. तसेच पाली बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी भाजपचे आमदार रवींद्र पाटील यांनी मुख्यमंत्री व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली असून या विषयावर शासनाची सकारात्मक भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

अष्टविनायक तीर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाली येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बायपास मार्गाचे काम जलदगतीने व्हावे यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पालीचे आधुनिक आणि अद्ययावत शहरात रूपांतर करण्यासाठी शासन सकारात्मक असून शहरात भूमिगत विद्युत वाहिन्या व नवीन फीडर उभारणीसाठी सतीश धारप यांच्या माध्यमातून ऊर्जामंत्र्यांची भेट घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

याशिवाय परळी-जांभूळपाडा विभागात नवीन सबस्टेशन उभारण्यासाठी परळी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून चार एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हा प्रश्नही लवकरच मार्गी लागणार असल्याचा विश्वास देसाई यांनी व्यक्त केला.जनतेचा विश्वास कायम राखत विकासकामांना गती देणे आणि आगामी नगरपंचायत निवडणुकीत विजय मिळविणे हेच आमचे प्रमुख लक्ष्य आहे असे प्रकाश देसाई यांनी शेवटी सांगितले.

यावेळी भाजप नेत्या गीताताई पालरेचा यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता, नगराध्यक्ष पराग मेहता,सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, माजी नगराध्यक्ष आरिफ मणियार, जिल्हा किसान मोर्चा अध्यक्ष सुजित बारसकर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष प्रणाली शेठ, पाली शहराध्यक्ष सुशील शिंदे तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हमरापूर फाटा येथील महिलेच्या हत्येप्रकरणी २४ तासांत दोन आरोपी गजाआड

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापूर फाटा परिसरातील शितोळेवाडी येथे एका महिलेची निघृण हत्या करून तिचा मृतदेह झाडीझुडपात अर्धनग्न अवस्थेत फेकून दिल्याच्या धक्कादायक घटनेचा उलगडा पेण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत केला आहे. घटनास्थळी मिळालेल्या मोबाईल फोनच्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी दोन आरोपींपर्यंत पोहचत त्यांना अटक केली.

मृत महिला अंबी जान्या जाधव या पतीपासून विभक्त राहत होत्या. त्या काही काळ माहेरी राहत होत्या तर कधी पेण परिसरात एकट्याच वास्तव्यास असत. घटनेच्या सुमारे आठ दिवसांपूर्वी त्या माहेरहून स्वतःहून पेण येथे आल्या होत्या. दरम्यान, अज्ञात आरोपींनी त्यांना मारहाण करून गळा दाबत त्यांची हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह झाडीझुडपात टाकून घटनास्थळावरून पलायन केले होते.

घटनेची माहिती मिळताच पेण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सूत्रे वेगाने हाती घेतली. तपासादरम्यान घटनास्थळावर मिळालेल्या मोबाईल फोनचा धागा पोलिसांच्या हाती लागला. या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले असता संबंधित सिमकार्ड धारक यांची ओळख पटली.

त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदर मोबाईल क्रमांक पूर्वी त्यांच्यासोबत काम करणाऱ्या रामअवतार उर्फ शेरा भाय रामविश्वास केवत (रा. मुंगोशी क्रशर, ता. पेण) याला दिला असल्याची माहिती दिली. या धाग्याच्या आधारे तपास पथकाने विविध क्रशर खाणींमध्ये शोधमोहीम सुरू केली.

अखेर रामअवतार उर्फ शेरा हा मुंगोशी येथील एका क्रशर खाणीवर आढळून आला. त्याची कसून चौकशी करण्यात करण्यात आली असता त्याने आपल्या साथीदार सुनील विश्वकर्मा राहणार मध्य प्रदेश याच्यासह हा खून केल्याची कबुली दिली.



## तिकीट तपासणी पथकाने बोगस आरपीएफ कर्मचाऱ्याला पकडले

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या ट्रॅव्हलिंग तिकीट इन्स्पेक्टर्स श्रद्धा साळुंखे आणि केतकी कदम यांनी ८ जून रोजी मुंबई विभागातील मानखुर्द आणि वडाळा रोड स्थानकांदरम्यान धावणाऱ्या वातानुकूलित उपनगरी ट्रेनमध्ये विनातिकीट प्रवास करणाऱ्या आणि रेल्वे सुरक्षा दलाचा कर्मचारी असल्याचे खोटे सांगणाऱ्या एका व्यक्तीला पकडले आहे.

८ जून रोजी सायंकाळच्या वेळी वातानुकूलित उपनगरी ट्रेनमध्ये कर्तव्यावर असताना श्रद्धा साळुंखे आणि केतकी कदम यांनी एका प्रवाशाची तिकीट तपासणी केली. त्याने स्वतःची ओळख आरपीएफ कर्मचारी अशी करून दिली. आरपीएफचे ओळखपत्र दाखवले. परंतु प्रवासासाठी आवश्यक असलेले अधिकृत तिकीट किंवा पास तो सादर करू शकला नाही. त्याच्या ओळखपत्राबाबतही संशय निर्माण झाला. काही प्रश्नांची उत्तरे देण्यात तो अपयशी ठरल्याने त्यांचा संशय बळावला. स्वतःची ओळख 'एम. डी. मलंग' अशी सांगणाऱ्या या प्रवाशाला ताब्यात घेण्यात आले. त्वरित आरपीएफ व शासकीय रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. लोकमान्य टिळक टर्मिनस रेल्वे पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेकडुन सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सरकारी कर्मचारी असल्याचे खोटे सांगणे हा फौजदारी गुन्हा आहे. आरपीएफचे खरे कर्मचारी अधिकृत ओळखपत्र बाळगतात आणि तिकीट तपासणीच्या कामात सहकार्य करतात. रेल्वे कर्मचारीअसल्याचे सांगणाऱ्याकोणत्याही संशयास्पद व्यक्तीबाबत त्वरित हेल्पलाइन क्रमांक१३९, जवळचे आरपीएफ पोस्ट किंवा कर्तव्यावर असलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांकडे तक्रार करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## अनियमित वीजपुरवठ्यामुळे ग्रामीण आरोग्यसेवा धोक्यात; गंभीर रुग्णांचे हाल

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण आणि आदिवासी भागातील रुग्णांसाठी जीवनदायी ठरणारी आरोग्यसेवा आज अनियमित वीजपुरवठ्यामुळे गंभीर संकटात सापडली आहे. सतत होणाऱ्या पॉवर फ्लक्चुएशन्समुळे महत्त्वाची वैद्यकीय उपकरणे वारंवार बिघडत असून त्याचा थेट फटका गंभीर रुग्णांच्या उपचारांवर होत आहे. यामुळे डॉक्टर आणि रुग्ण दोघांनाही प्रचंड मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

माणगाव येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत सांगितले की, अतिदक्षता विभागातील अनेक महत्त्वाची उपकरणे अनियमित वीजपुरवठ्यामुळे बंद पडत आहेत. त्यामुळे गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे अत्यंत कठीण बनले आहे.

विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील रुग्ण मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये जाण्यास टाळाटाळ करतात. आर्थिक परिस्थिती, प्रवासाचा खर्च आणि शहरातील उपचारांचा वाढता भार यामुळे हे रुग्ण स्थानिक स्तरावरच उपचार घेण्यास प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेली उपकरणे बंद पडल्यास रुग्णांच्या जीवाला थेट धोका निर्माण होतो.

सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे गंभीर रुग्णांसाठी अत्यावश्यक असलेला व्हेंटिलेटर सध्या बंद अवस्थेत आहे. काही महिन्यांपूर्वी तब्बल दोन लाख रुपये खर्च करून तो दुरुस्त करण्यात आला होता. मात्र, पुन्हा एकदा पॉवर फ्लक्चुएशन्समुळे तो निकामी झाला असून आता त्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे तीन लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. एवढा मोठा खर्च करणे शक्य नसल्याने हा व्हेंटिलेटर वापरात आणता येत नाही. परिणामी अनेक गंभीर रुग्णांना आवश्यक ती जीवनरक्षक सुविधा मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

वीजपुरवठ्यातील चढ-उतार नियंत्रित करण्यासाठी रुग्णालयात सुमारे एक लाख रुपये खर्च करून उच्च क्षमतेचा स्टॅबिलायझर बसविण्यात आला. मात्र, वीजेतील असामान्य आणि तीव्र चढ-उतारांमुळे हा स्टॅबिलायझर देखील निष्प्रभ ठरत आहे. इतकेच नव्हे तर त्यातील पॉवर सर्किट्सही वारंवार खराब होत असल्याने अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

उपकरणे बिघडल्यानंतर त्यांची दुरुस्ती करण्यासाठी शहरातील विशेष केंद्रांमध्ये पाठवावी लागतात. यामध्ये मोठा खर्च तर होतोच, शिवाय उपकरणे परत येण्यासाठी बराच कालावधी लागतो. तोपर्यंत रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होतात.

डॉ. पाटणकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, ही समस्या केवळ एखाद्या डॉक्टरची किंवा रुग्णालयाची वैयक्तिक समस्या नसून तिचे मूळ कारण अनियंत्रित वीजपुरवठा आहे. ग्रामीण भागातील नागरिक, व्यापारी आणि उद्योगधंदे यांनाही अशाच समस्यांचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. मात्र आरोग्यसेवेशी संबंधित या समस्येची तीव्रता सर्वसामान्यांना फारशी माहित नसते.

"जेव्हा एखाद्या गंभीर रुग्णासाठी आवश्यक उपकरण अचानक बंद पडते, तेव्हा त्याचे परिणाम केवळ आर्थिक नसतात; ते थेट मानवी जीवाशी संबंधित असतात," असे मत व्यक्त करत त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## ग. बा. वडेर हायस्कूलच्या दहावीच्या २००१ बॅचचा स्नेहमेळावा

**पाली : प्रतिनिधी**

भले भूतकाळातले दिवस परत आणता येत नसले, तरी त्या आठवणींना उजाळा देण्यासाठी पाली येथील ग. बा. वडेर हायस्कुलच्या २००१ च्या दहावी तुकडी 'ब' बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळावा (गेट टुगेदर) उत्साहात साजरा केला. केवळ जुन्या आठवणींमध्ये न रमता सामाजिक बांधिलकी जपत या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेला सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन भेट देऊन एक आदर्श पायंडा घालून दिला आहे.



शालेय जीवन संपल्यानंतर प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात आणि संसारात व्यस्त झाला होता. तब्बल अडीच तप म्हणजेच २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा आपल्या सवंगड्यांना भेटण्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. या कौटुंबिक स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या बालपणीच्या आणि शालेय जीवनातील सोनेरी आठवणींना उजाळा दिला. एकमेकांच्या सुख-दुःखाची चौकशी करत जुन्या मित्रांनी जुन्या आठवणींचे कप्पे पुन्हा जिवंत केले.

केवळ आनंदोत्सव साजरा न करता आपल्या शाळेसाठी काहीतरी उपयुक्त कार्य करावे, या उद्देशाने या बॅचच्या वतीने शाळेतील विद्यार्थिनींच्या आरोग्याचा व सुविधेचा विचार करून एक सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन विद्यालयाला भेट म्हणून देण्यात आली. माजी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आणि सर्व माजी मित्रांना एका छताखाली आणण्यासाठी राजेश रुईकर आणि संदीप तिरमले यांनी विशेष मेहनत घेतली.

## बोरघाट स्वच्छता अभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील सामाजिक संस्था 'यशवंती हायकर्स खोपोली'आणि 'खोपोली नगरपरिषद' यांच्या संयुक्त विद्यमाने बोरघाट स्वच्छता अभियानाचा पाचवा टप्पा नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला.



आत्तापर्यंतच्या टप्प्यांप्रमाणेच हा टप्पाही ऐतिहासिक बोरघाटाला कचरामुक्त करण्यासाठी राबवला गेला, घाटात जे चित्र समोर आले ते अत्यंत वेदनादायक आणि सुन्न करणारे असल्याचे या अभियानातील महेंद्र भंडारे यांनी सांगितले.

घाटात फक्त कचरा नाही, तर 'नशेचे' जाळे पसरतेय!

आत्तापर्यंतच्या मोहिमांमध्ये प्लास्टिक आणि काचेच्या बाटल्या गोळा करणे हे मोठे आव्हान होते. पण पाचव्या टप्प्याचे धक्कादायक वैशिष्ट्य म्हणजे, नेहमीप्रमाणे सापडणाऱ्या दारूच्या बाटल्यांसोबतच थेट रस्त्याच्या कडेला नशेसाठी वापरण्यात आलेल्या 'इंजेक्शनच्या सुया' (सिरिंज) सापडल्या.

हे भीषण वास्तव केवळ निसर्गाला प्रदूषित करणारे नाही, तर आपल्या तरुण पिढीला लागलेल्या एका भयानक रोगाची आणि विकृतीची साक्ष देत आहे. रस्त्याच्या अगदी कडेला अशा वापरलेल्या सिरिंज टाकणे हे घाटात येणाऱ्या पर्यटकांसाठी, ट्रेकर्ससाठी आणि स्वच्छता करणाऱ्या सदस्यांसाठी अत्यंत धोकादायक व जीवघेणे ठरू शकते.

यशवंती हायकर्स आणि खोपोली नगरपरिषद केवळ कचरा उचलण्याचे काम करत नाही, तर या पवित्र सह्याद्रीचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. पण ही लढाई फक्त आमची एकट्याची नाही. असे महेंद्र भंडारे यांचे म्हणणे आहे.बोरघाट परिसरात रात्रीच्या वेळी आणि निर्जन ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवणे आता अत्यंत गरजेचे झाले आहे.

## आपटा गावाच्या हद्दीतील स्मशानभूमीमध्ये अघोरी प्रकार, स्मशानाची दुरवस्था

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावाच्या हद्दीतील नदीकिनारी असलेल्या स्मशानामध्ये कोणीतरी अघोरी प्रकार केलेला आढळून आला आहे यामध्ये जेथे अंत्यसंस्कार केले जातात त्या चारी खांबाला काळा दोरा बांधून नारळ लिंबू आणि वांग्याला अनेक दोरे असे बांधलेले होते यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले परंतु याबाबत कोणीही पोलिसात गुन्हा दाखल केलेला नाही.

आपटा स्मशानभूमीची प्रचंड दुरावस्था झाली आहे . तिथे प्रचंड कचरा पडलेला आहे. बसायची बाकडे मोडलेले आहे .कधी विजेची सोय असते कधी नसते .ग्रामपंचायतीने स्मशानभूमी कोणी स्वच्छ करायची ,स्मशानभूमीत मध्ये नियमितपणे स्वच्छता व वीज विजेचा पुरवठा आहे की नाही हे पाहिले पाहिजे .

कारण ग्रामस्थांना रात्री फार अडचणींना सामना करावा लागतो काही ठिकाणी वरील छत व पत्रे उडालेले आहे ते छप्पर बसवणे गरजेचं आहे नाहीतर पावसाळ्यामध्ये तिथे अंत्यसंस्कार केले जातात त्या ठिकाणी पावसाची पाणी पडू शकते त्या भागातील नदी जवळ असल्यामुळे तिथे काही लोक शौचालाही येतात अशी तक्रार काही ग्रामस्थांनी केलेली आहे.


## पावसाची चाहूल लागताच घाटमाथ्याकडे मेंढपाळांची वाटचाल

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणात पावसाळ्याचे आगमन जवळ आल्याने गेल्या सहा महिन्यांपासून कोकणात वास्तव्यास असलेले घाटमाथ्यावरील मेंढपाळ आता आपल्या शेळ्या-मेंढ्यांसह परतीच्या प्रवासाला लागले आहेत. दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात हे मेंढपाळ आपल्या कळपांसह कोकणात दाखल होतात आणि उन्हाळ्याच्या अखेरीपर्यंत येथे वास्तव्यास राहतात.

कोकणातील जंगल परिसरात तसेच मोकळ्या जागांमध्ये शेळ्या-मेंढ्या चारून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. याचबरोबर कोकणातील अनेक शेतकरी आपल्या शेतांमध्ये या कळपांना रात्री बसवितात. मेंढ्या व बकऱ्यांच्या विष्ठेमुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. नैसर्गिक खताचा लाभ मिळाल्याने शेतकऱ्यांची शेती मशागतही होते. त्याबदल्यात शेतकरी मेंढपाळांना ठराविक मानधन देतात. सुमारे सहा महिन्यांच्या मुक्कामानंतर आता पावसाळ्याची चाहूल लागल्याने मेंढपाळांनी घाटमाथ्याकडे परतीचा प्रवास सुरू केला आहे.

शेकडो शेळ्या-मेंढ्यांचे कळप घेऊन हे मेंढपाळ दररोज अनेक किलोमीटरचा पायी प्रवास करीत आहेत. उन्हाचा कडाका वाढत असल्याने सकाळच्या थंड वातावरणात अधिक प्रवास केला जात असून दुपारच्या वेळेत झाडांच्या सावलीत विश्रांती घेतली जात आहे. कोकण आणि घाटमाथा यांना जोडणारी ही पारंपरिक भटकंतीची पद्धत आजही कायम आहे.



# बांगलादेशने कांगारूंना लोळवले!

## नाहिद राणाचा कहर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशने वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलियाचा तीन वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात ८६ धावांनी पराभव करत २१ वर्षांचा दुष्काळ संपवला आहे. २००५ नंतर बांगलादेशचा ऑस्ट्रेलियावरील हा फक्त दुसराच वनडे विजय ठरला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने ५० षटकांत ८ बाद २८४ धावा केल्या. मोसाद्देक हुसेनने ७ चौकार, ३ षटकारांसह ८६ धावांची मॅचविनिंग खेळी केली. त्याला तनजीद हसन ५४ आणि कर्णधार नजमुल हुसेन शांतो ६७ यांनी उत्तम साथ दिली.

२८५ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची अवस्था ४२.२ षटकांत ९ बाद १९१ अशी झाली होती. तेवढ्यात पावसाने हजेरी लावली. सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही आणि डकवर्थ लुईस नियमानुसार बांगलादेश ८६ धावांनी विजयी घोषित झाला.

दरम्यान, या विजयाचा खरा हिरो ठरला २३ वर्षीय वेगवान गोलंदाज नाहिद राणा. त्याने १० षटकांत ४ बळी घेत कांगारूंची कंबर मोडली. तस्किन अहमदने पहिल्याच चेंडूवर विकेट काढून ऑस्ट्रेलियाला धक्का दिला होता तसेच ठराविक अंतराने विकेट पडत गेल्याने ऑस्ट्रेलिया कधीच सामन्यात दिसला नाही.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार जोस इंग्लिस बाद झाल्यावर नाहिद राणाने आक्रमक सेलिब्रेशन केले. त्यावरून थोडा वाद झाला, पण बांगलादेशच्या खेळाडूंनी मध्यस्थी करून प्रकरण शांत केले. याआधी २००५ मध्ये कार्डिफला मोहम्मद अश्रफुलच्या शतकाच्या जोरावर बांगलादेशने पॉन्टिंग, गिलक्रिस्ट, मॅकग्रा, गिलेस्पी असलेल्या तगड्या ऑस्ट्रेलियाला पाच विकेटने हरवले होते. २१ वर्षांनी पुन्हा एकदा बांगलादेशने कांगारूंना लोळवले आहे. मोसाद्देक हुसेनला ८६ धावांच्या खेळीसाठी सामनावीर पुरस्कार मिळाला. या विजयासह बांगलादेशने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

# चिपळूणच्या तन्वी रेडीजने जिंकले जागतिक सुवर्ण

## वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये उत्तुंग कामगिरी

**चिपळूण : प्रतिनिधी**

चिपळूण येथील पाग व्यायामशाळेची योगपटू तन्वी रेडीज हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी करत वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे चिपळूणसह संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

हरियाणा येथे झालेल्या निवड चाचणी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून तन्वीची गुजरात येथे आयोजित करण्यात आलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी भारतीय



संघात निवड झाली होती. या स्पर्धेत ५५ हून अधिक देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत तन्वीने आपल्या कौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार सादर करत सुवर्णपदक पटकावले. तन्वीने यापूर्वीही योगासन प्रकारात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २०२३ मध्ये झालेल्या एशियन योगासन चॅम्पियनशिपमध्ये तिने दोन सुवर्णपदके जिंकली होती.

आतापर्यंतच्या कारकिर्दीत तिने १० सुवर्ण, ५ रौप्य व १ कांस्यपदक मिळवून वेगळी ओळख निर्माण केली. तन्वीच्या यशामागे तिचे प्रशिक्षक रणवीर सावंत यांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत. तिच्या या जागतिक यशाबद्दल नवकौकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे, पाग व्यायामशाळेचे शांताराम जोशी आदींनी अभिनंदन केले आहे.

# हार्दिकला पुन्हा दुखापतीचा फटका!

## तंदुरुस्त घोषित होताच अफगाणिस्तान मालिकेतून बाहेर



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी मोठा धक्का बसला आहे. आघाडीचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या दुखापतीमुळे संपूर्ण मालिकेतून बाहेर पडला आहे. विराट कोहली आधीच भारतीय प्रीमियर लीगदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे संपूर्ण मालिकेला मुकला आहे, त्यात आता हार्दिकच्या बाहेर पडण्याने संघाची चिंता वाढली आहे.

आदल्या दिवशी हार्दिक तंदुरुस्त असल्याचे जाहीर करण्यात आले होते आणि तो ११ जून रोजी धर्मशाला येथे संघात सामील होणार होता. मात्र अवघ्या एका दिवसात चित्र बदलले. एका वृत्तानुसार हार्दिकच्या पायाचा घोटा मुरगळला असून त्यामुळे त्याला या मालिकेला मुकावे लागत आहे. ही दुखापत फारशी गंभीर नसली तरी ती बळावू नये म्हणून वैद्यकीय पथकाने त्याला विश्रांतीचा सल्ला दिला आहे. त्यामुळे हार्दिकला आणखी दोन आठवडे बंगळुरू येथील भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या उत्कृष्टता केंद्रात थांबावे लागणार आहे.

दरम्यान, भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १४ जूनपासून धर्मशाला येथे सुरू होत आहे. हार्दिक या मालिकेतून १५ महिन्यांनंतर एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार होता, पण दुखापतीमुळे आता त्याचा मार्ग रोखला गेला आहे.

# ऋतुराजचा क्लास पाहायला आगरकर मैदानात

**मुंबई : प्रतिनिधी**

धडाकेबाज फलंदाज ऋतुराज गायकवाडचे नाव सध्या चर्चेत आहे. त्याने लिस्ट 'अ' क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडला. तरीही भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी करावी लागणारी प्रतीक्षा चकित करणारी ठरत आहे. ऋतुराज भारत 'अ' संघासोबत श्रीलंका दौऱ्यावर आहे. भारत, श्रीलंका व अफगाणिस्तान 'अ' संघांदरम्यान खेळवल्या जाणाऱ्या तिरंगी वनडे मालिकेतील पहिला सामना ८ जूनला दांबुलात खेळला गेला. मुख्य निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर स्वतः सामना पाहण्यासाठी व खेळाडूंच्या कामगिरीवर नजर ठेवण्यासाठी उपस्थित होते.

# पाकिस्तानचा नवा संघ जाहीर; बाबर, रिझवान, आफ्रिदीला वगळले

## साहिबजादा फरहानकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ साठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. या संघात मोठा बदल करत पीसीबीने बाबर आझम, मोहम्मद रिझवान, शाहीन शाह आफ्रिदी, हारिस रौफ आणि सलमान आगा या वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती दिली आहे. पाकिस्तान संघाचे नेतृत्व साहिबजादा फरहानकडे सोपवण्यात आले आहे.

पीएसएलमध्ये धमाकेदार कामगिरी करणाऱ्या फरहानवर पीसीबीने विश्वास दाखवला आहे. अष्टपैलू अब्दुल समद उपकर्णधार असेल. या संघात सईम अयूब, हैदर अली, सुफयान मोकिम, अराफात मिन्हास, हसन नवाज, अली रझा, माज सदाकत यांसारख्या युवा खेळाडूंचा समावेश आहे. अबरार अहमद, अहमद दानियाल, आकिफ जावेद हे गोलंदाजीत धार वाढवतील. यष्टिरक्षणाची जबाबदारी उस्मान खान सांभाळेल.




पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत एकूण १० संघ असतील. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि यजमान जपान हे संघ थेट पात्र झाले आहेत. हाँगकाँग, मलेशिया, ओमान आणि नेपाळ यांनी पात्रता फेरी जिंकून प्रवेश मिळवला आहे. मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत ऋतुराजच्या नेतृत्वाखाली भारताने सुवर्णपदक जिंकले होते. पावसामुळे अफगाणिस्तान विरुद्धचा अंतिम सामना रद्द झाला व रँकिंगआधारे भारताला विजेता घोषित करण्यात आले. पाकिस्तानचा हा नव्या दमाचा संघ आशियाई स्पर्धेत कशी कामगिरी करतो, याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

**पाकिस्तानचा संघ :**

साहिबजादा फरहान (कर्णधार), अब्दुल समद (उपकर्णधार), अबरार अहमद, अहमद दानियाल, आकिफ जावेद, अली रझा, अराफात मिन्हास, हैदर अली, हसन नवाज, माज सदाकत, मोहम्मद सलमान मिर्झा, साद मसूद, सईम अयूब, सुफयान मोकिम, उस्मान खान (यष्टिरक्षक).

# भारत 'अ' संघाचा थरारक विजय

## ४९व्या षटकात फिरली लढत



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत 'अ' संघाने श्रीलंका 'अ' विरुद्ध तिरंगी मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना ८ धावांनी जिंकला. कोलंबो येथे प्रथम फलंदाजी करताना भारताने ६ बाद २७७ धावा केल्या. ६९ धावांत ३ गडी बाद झाल्यानंतर ऋतुराज गायकवाडने शतक झळकावत कर्णधार तिलक वर्मासोबत १४८ धावांची भागीदारी केली.

आयुष बदोनी आणि सुयांश शेडगे यांनी शेवटी फटकेबाजी केली. भारतीय प्रीमियर लीग गाजवणारा वैभव सूर्यवंशी १४ धावांवर बाद झाला. २७८ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा सहान अराचचिगे अर्धशतक करून संघाला जिंकवण्याच्या बेतात होता. पण ४९व्या षटकात अर्शद खान आणि अंशुल कंबोजने ३ गडी बाद करत लढतीला कलाटणी दिली. श्रीलंकेचा डाव ४८.५ षटकांत २६९ धावांत संपला. तिलक वर्मा म्हणाला, सहानला अंशुलने टाकलेला टप्पा पडताच थेट यष्ट्यांवर आदळणारा चेंडू वळणबिंदू होता.

# अर्जुन तेंडुलकरच्या कृतीने जिंकली चाहत्यांची मने

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० मुंबई लीग स्पर्धेच्या १६ व्या सामन्यात आर्क्स अंधेरी संघाकडून खेळताना अर्जुन तेंडुलकरने ३ गडी बाद करत नाबाद ६६ धावांची मॅचविनिंग खेळी केली. बांद्रा ब्लास्टर्सविरुद्ध मुशीर खानच्या साथीने शतकी भागीदारी करत त्याने संघाला विजय मिळवून दिला आहे. यादरम्यान अर्जुनने मारलेला चेंडू स्टँडमधील एका लहान मुलाच्या डोक्याला लागल्याने सामना संपल्यानंतर त्याने प्रत्यक्ष जाऊन त्या मुलाची विचारपूस केली आणि ऑटोग्राफ दिला, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.





दरम्यान, अर्जुन तेंडुलकर हा गेल्या काही वर्षांपासून आयपीएल स्पर्धेचा एक भाग आहे. पण त्याला फार सामने खेळण्याची संधी अजून मिळालेली नाही. मुंबई इंडियन्सकडून खेळताना त्याला बाकावर बसून राहावं लागलं होतं. त्यानंतर आयपीएल २०२६ स्पर्धेत त्याला लखनऊ सुपर जायंट्स संघाने आपल्या संघात स्थान दिलं. पण शेवटच्या सामन्यापर्यंत एकही सामना खेळण्याची संधी दिली नव्हती. लखनऊचा संघ जेव्हा स्पर्धेतून बाहेर पडला, त्यावेळी त्याला शेवटचा १ सामना खेळण्याची संधी दिली. या सामन्यातही त्याने उत्तम गोलंदाजी केली होती.

दरम्यान, आता सध्या तेंडुलकर टी-२० मुंबई लीग स्पर्धेत आर्क्स अंधेरी संघाचं प्रतिनिधित्व करीत आहे. या संघाकडून खेळताना त्याची अष्टपैलू कामगिरी वारंवार पाहायला मिळाली आहे. बांद्रा ब्लास्टर्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यातदेखील अर्जुन तेंडुलकरने पहिल्या डावात गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. त्यानंतर धावांचा पाठलाग करताना त्याने नाबाद ६६ धावांची खेळी करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

# चाहत्याच्या प्रेमाने सूर्यकुमार भारावला




**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० मुंबई लीगमध्ये खेळताना कर्णधार सूर्यकुमार यादवला भेटण्यासाठी एक चाहता थेट मैदानात घुसला. फलंदाजी करत असलेल्या सूर्यकुमारच्या पायाला पकडत त्याने सेल्फीची विनंती केली आणि सूर्यकुमारनेही तितक्याच आपुलकीने त्याला जवळ घेऊन फोटो काढला. सूर्यकुमारच्या या कृतीचा व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे.

भारताला टी-२० विश्वचषक जिंकवून देणारा सूर्यकुमार यादव सध्या भारतीय संघातून बाहेर आहे. वय आणि भविष्याचा विचार करून त्याला टी-२० संघातून वगळण्यात आले असून जसप्रीत बुमराहकडे संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे, मात्र सूर्यकुमार सध्या टी-२० मुंबई लीगमध्ये ट्रायम्फ नाईट्स मुंबई संघाचे नेतृत्व करत आहे. ८ जून रोजी ईगल ठाणे स्ट्रायकर्सविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमार फलंदाजी करत असताना एक चाहता सुरक्षेच्या नियमांना डावलून थेट मैदानात आला.

त्याने धावत येऊन सूर्यकुमारचे पाय धरले. अचानक घडलेल्या या प्रकाराने सूर्यकुमार मागे सरकला, पण त्याने चाहत्याला रागावण्याऐवजी

## पाय धरताच मारली मिठी

हाताने सांभाळून घेतले. त्यानंतर चाहत्याने सूर्यकुमारला मिठी मारली. अंपायरने त्याला बाजूला करण्यास सांगितले तेव्हा चाहत्याने फोटो काढण्याची इच्छा व्यक्त केली. हे ऐकताच सूर्यकुमारने त्याला स्वतःजवळ बोलावले आणि हसतहसत सेल्फी काढला.

त्या घटनेनंतर सेल्फी झाल्यानंतर सुरक्षारक्षक चाहत्याला मैदानाबाहेर घेऊन जात असताना सूर्यकुमारने त्यांना "सांभाळून घ्या" अशी विनंती केली. सूर्यकुमारच्या या माणुसकीच्या कृतीने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. या सामन्यात सूर्यकुमार १० धावा करून बाद झाला, मात्र त्याने आधीच्या दोन सामन्यांत वादळी खेळी केली होती. सूर्यकुमारला संघातून वगळल्याने चाहते नाराज असले तरी त्याची कामगिरी आणि त्याचे चाहत्यांवरील प्रेम कायम असल्याचे या घटनेतून दिसून आले. दरम्यान, सूर्यकुमारच्या या कृतीचा व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. चाहत्यांकडूनदेखील त्याचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# फिफा विश्वचषकापूर्वीही क्रिकेटची क्रेझ

## इंग्लंडच्या खेळाडूंचा फुटबॉलऐवजी बॅट-बॉलवर सराव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिकेत ११ जूनपासून सुरू होणाऱ्या फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी इंग्लंडचा फुटबॉल संघ दाखल झाला आहे. १९६६ नंतर पहिल्यांदाच जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी सज्ज झालेल्या इंग्लंड संघाचा एक रंजक व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

इंग्लंडचा क्रिकेट संघ विश्वविजेत्या संघांपैकी एक आहे. २०१९ मध्ये घरच्या मैदानावर खेळताना इंग्लंडने वनडे विश्वचषकाची ट्रॉफी उंचावली होती. आता इंग्लंडचा फुटबॉल संघ फिफा विश्वचषकाची ट्रॉफी उंचावण्यासाठी सज्ज झाला आहे. फुटबॉल चाहते गेल्या चार वर्षांपासून या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते. तो क्षण अखेर आला आहे. फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेला येत्या ११ जूनपासून सुरुवात होणार आहे तर या स्पर्धेतील अंतिम सामना ११ जुलैला खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचे आयोजन कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिका केले जाणार आहे. या स्पर्धेसाठी सर्व संघ





दाखल झाले आहेत. दरम्यान इंग्लंडचा संघ देखील अमेरिकेत दाखल झाला आहे. दरम्यान, इंग्लंडच्या खेळाडूंचा सराव करताना व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

इंग्लंडला १९६६ नंतर एकदाही फिफा विश्वचषक जिंकता आले नाही. त्यामुळे यावेळी इंग्लंडचा संघ जेतेपदासाठी पूर्ण जोर लावताना दिसून येणार आहे. इंग्लंडचा संघ १५ जूनला ट्युनिशियाविरुद्ध होणाऱ्या सामन्याने सुरुवात करणार आहे. स्पर्धेसाठी इंग्लंडचा संघ एल गार्डा येथे समावेश करण्यात आला आहे. या सामन्याआधी इंग्लंडचे खेळाडू सराव करताना व्यस्त आहेत. इंग्लंड फुटबॉल संघाच्या अधिकृत अकाऊंटवरून एक फोटो शेअर करण्यात आला. यात इंग्लंडचे खेळाडू सराव म्हणून क्रिकेट खेळताना दिसत आहेत.

# सूर्यकुमार-हार्दिकमध्ये नाराजीच्या चर्चांना उधाण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. सोशल मीडियावर त्याने मुंबई इंडियन्सला काही वेळ अनफॉलो केल्याची चर्चा रंगली, त्यानंतर पुन्हा फॉलो केल्याने चाहत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. याचदरम्यान संघाशी संबंधित काही पोस्टही त्याच्या अकाऊंटवरून हटवल्याचे दिसून आले. त्यामुळे सूर्यकुमार आणि मुंबई इंडियन्स यांच्यात काहीतरी बिनसले आहे का, या अफवांना हवा मिळाली. विशेष म्हणजे सूर्यकुमार सध्या मुंबई इंडियन्सकडून खेळत असला तरी संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या मात्र त्याला फॉलो करत नाही. त्यामुळे दोघांमधील नातेसंबंधांबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत, मात्र याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सूर्यकुमार यादवच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीबाबत सध्या अनेक चर्चा सुरू आहेत. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी अलिकडेच भविष्यातील स्पर्धांचा विचार करून नेतृत्वासाठी युवा खेळाडूंना संधी देण्याचे संकेत दिले आहेत. श्रेयसकडे भविष्यातील नेतृत्वाच्या दृष्टीने पाहिले जात असल्याचे मानले जाते. २०२५ ऑलिम्पिक आणि आगामी टी-२० विश्वचषक लक्षात घेता संघ व्यवस्थापन दीर्घकालीन नियोजन करत आहे. त्यामुळे उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या तरुण खेळाडूंना स्पर्धेत सूर्यकुमारसाठी पुढील राष्ट्रीय संघाचे नेतृत्व मिळणे सोपे राहणार नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com